दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष
शुक्रवार, दि. ०६ मार्च २०२६
www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## पासेस मिळत नसतील तर वानखेडे ताब्यात घ्या



मुंबई (दै. संध्या) : मुंबईतील ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या भारत विरुद्ध इंग्लंड क्रिकेट सामन्याच्या पासेसवरून आज विधानसभा सभागृहात सत्ताधारी बाकांवरील आमदारांमध्येच खडाजंगी पाहायला मिळाली. "दोन पासेससाठी लोकप्रतिनिधींना मौताज रहावे लागत असेल, तर महसूल विभागाने तांत्रिक फाईल तपासून वानखेडे स्टेडियम तातडीने सरकारच्या ताब्यात घ्यावे," अशी आक्रमक मागणी भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केली. यावर आशिष शेलार यांनी मध्यस्थी करत कायदेशीर कराराची आठवण करून दिली. टी-२० विश्वचषकातील दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड यांच्यात होत आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर या सामन्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा सामना पाहण्यासाठी आपल्याला पासेस मिळावेत, अशी मागणी आमदारांनी आज सभागृहात केली.

### ढिंग-टांग




# श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर परिसराचा विकास करा

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसर विकास आराखडा शिखर समिती बैठक; १७० कोटींच्या सुधारित विकास आराखड्यास मान्यता ■

मुंबई (दै. संध्या)

कोल्हापूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर येथे राज्यातूनच नव्हे, तर देशातून मोठ्या संख्येने भाविक घेत असतात. या परिसराचे पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्व आहे. या मंदिर परिसराचा विकास हा पर्यावरणीय दृष्टिकोनातून करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसर विकासाचा एकूण आराखडा २५० कोटी रुपयांचा आहे, त्यापैकी ८० कोटी रुपयांची कामे सुरू झालेली आहेत. श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसराचा सुधारित १७० कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे आयोजित शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.



बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वन मंत्री गणेश नाईक, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार विनय कोरे, आमदार राहुल आवाडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, प्रधान सचिव (ग्रामविकास) एकनाथ डवले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ज्योतिबा मंदिर डोंगर परिसराचा विकास करताना मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात यावी. आधी लागवड केलेल्या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे. डोंगर परिसरावर घनकचरा व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यात यावे. मंदिर परिसरात अनेक भाविक अन्नदान करीत असतात या अन्नदानाकरिता अन्न छत्रालय विकसित करण्यात यावे. येथे जास्तीत जास्त भाविक सामावून घेण्याची क्षमता असावी.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, डोंगर परिसराचे पर्यावरणीय महत्त्व लक्षात घेता, येथे असणाऱ्या वस्तीमधील सांडपाणी व्यवस्थापन करावे. येथे येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता स्वच्छतेबाबत काटेकोर नियोजन करण्यात यावे. डोंगर परिसरात असलेल्या वन जमिनीचे नियमानुसार हस्तांतरण करुन मंदिर परिसराचा विकास व्हावा, यासाठी स्वतंत्र प्राधिकरण बैठकीत सादरीकरण कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात असलेल्या श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसर विकास आराखड्यामध्ये श्री ज्योतिबा डोंगरावरील जुन्या पायवाटांच्या दुरुस्तीसह रुंदीकरण करण्यात येणार आहे. तसेच पायवाटांच्या बाजूने विविध प्रकल्पांमध्ये बाधित होणाऱ्या वृक्षांचे पुनर्रोपण, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, विद्युत नियंत्रण कक्ष, पोलीस कक्ष व देवस्थान व्यवस्थापन कार्यालय, यमाईदेवी मंदिर परिसरात भाविकांसाठी सुविधा केंद्र, मंदिराचे दक्षिणद्वार प्रवेश मार्गाची दुरुस्ती, शाहूकालीन हुजूरवाडा इमारत संवर्धन, कुशीरे ते गायमुख तलाव पार्किंगसह पादचारी मार्गाचा विकास, पाच मेगावॅट क्षमतेचे वीज उपकेंद्र व सौर ऊर्जा प्रकल्प, भाविकांसाठी निवास व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा कक्ष व अन्नछत्र, वाडी रत्नागिरी गावामधील रहिवासी व भाविकांसाठी कायमस्वरूपी पाणी पुरवठा व्यवस्था करण्यात येणार आहे.

### ६ मार्च रोजी मांडणार राज्याचा अर्थसंकल्प

महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून, शुक्रवारी ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. गेल्या दशकाभरापासून राज्याच्या आर्थिक नियोजनावर आपली पकड ठेवणारे आणि तब्बल ११ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम नावावर असलेले अजित पवार यावेळी सभागृहात नसतील. त्यांच्या अनुपस्थितीत राज्याच्या तिजोरीचे व्यवस्थापन आणि 'आर्थिक इंजिना'ची गती कायम राखण्याचे मोठे आव्हान फडणवीस यांच्यासमोर असणार आहे.

### ब्रेकिंग न्यूज

## 'एसबीएल'च्या मालकावर कुणाचा वरदहस्त

नागपूर (दै. संध्या) : काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील 'एसबीएल एनर्जी लिमिटेड'मध्ये झालेल्या स्फोटात १९ कामगारांचे बळी गेल्यानंतरदेखील कंपनीचा मालक संजय चौधरी व आलोक चौधरी फरारच आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे सक्षम व तंत्रज्ञानयुक्त गुप्तचर यंत्रणा असल्याचा दावा करणाऱ्या नागपूर ग्रामीण पोलिसांच्या हाती त्याचा अद्याप काहीही सुगावा लागलेला नाही. त्याच्या शोधासाठी तीन पथके रवाना करण्यात आली असून त्याला ताब्यात घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

## वाहतूक व्यवस्था होणार हायटेक

नागपूर (दै. संध्या) : नागपूर आणि अमरावती जिल्ह्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवासीभिमुख करण्याच्या सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत ही आढावा बैठक मुंबई विधानभवनातील महसूलमंत्र्यांच्या दालनात पार पडली. बैठकीत बसस्थानकांचे आधुनिकीकरण, नवीन बसेसची उपलब्धता आणि प्रवाशांच्या मूलभूत सुविधांबाबत निर्णय घेण्यात आले. उन्हाळ्याच्या दिवसात प्रवाशांची गैरसोय होऊ नये. तसेच परीक्षांच्या दिवसात विद्यार्थ्यांना बस थांब्यांवर बस थांबविली जावी. वाहन थांब्यांसाठी आवश्यक असल्यास डीपीडीसीमधून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन महसूलमंत्र्यांनी यावेळी दिले.

## जीबीएसचा धक्का

नीरा (दै. संध्या) : नीरा (ता. पुरंदर) परिसरात गिलियन–बारे सिंड्रोम (GBS) या आजाराचे दोन संशयित रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. उपचारादरम्यान ५० वर्षीय मन्सूर सय्यद यांचा मृत्यू झाला, तर ४६ वर्षीय कस्तुरी पटेल यांनी वेळेत उपचार घेतल्यामुळे पूर्णपणे बरे होऊन घरी परतल्या आहेत. प्रशासनाने परिसरात सर्वेक्षण, पाणी तपासणी आणि आरोग्य उपाययोजना सुरू केल्या आहेत. नीरा (ता. पुरंदर) परिसरात गिलियन–बारे सिंड्रोम या दुर्मिळ आजाराचे दोन संशयित रुग्ण आढळल्याने नागरिकांमध्ये काहीशी चिंता निर्माण झाली आहे.

## जलवाहतूक क्षेत्रात जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करणार : मंत्री राणे

मुंबई (दै. संध्या)

रायगड जिल्ह्यातील दिघी बंदराचा कायापालट करून तेथे जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यावर राज्य सरकारचा भर असल्याचे प्रतिपादन मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज येथे केले. मंत्रालयात आयोजित बैठकीत अदानी पोर्ट्स कडून दिघी बंदराच्या विकास आराखड्याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत बंदराच्या प्रगतीचा आणि सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दिघी बंदराचे आतापर्यंतचे काम अत्यंत शिस्तबद्ध आणि पूर्वनियोजित आराखड्यानुसार



सुरू असल्याचे मंत्री राणे यांनी नमूद केले. राज्यातील रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी आगामी काळात वॉटर ट्रान्सपोर्ट (जलवाहतूक) हा उत्तम पर्याय ठरणार आहे. यावर सरकार विशेष भर देत असल्याचेही मंत्री राणे म्हणाले. दिघी बंदर हे केवळ मालाची ने-आण करण्याचे केंद्र न राहता, ते जागतिक स्तरावरील एक लॉजिस्टिक हब म्हणून विकसित करण्याचा सरकारचा मानस आहे.

## मुंबईतील प्रत्येक रेल्वे स्थानकात आता 'आरोग्य कवच'

मुंबई (दै. संध्या)

■ विद्यार्थ्यांसाठी आरक्षित डब्याचा प्रश्न रेल्वेच्या अखत्यारीत

उपनगरीय रेल्वे मार्गांवरील वाढते अपघात आणि प्रवाशांचा जीवघेणा प्रवास रोखण्यासाठी राज्य सरकारने विशेष उपाययोजना करण्याचे ठरविले आहे. मुंबईतील प्रत्येक रेल्वे स्थानकात रुग्णवाहिका आणि आरोग्यविषयक सुविधा पुरवण्याबाबत आरोग्य विभागाला तातडीने सूचना दिल्या जातील, असे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी विधानसभेत दिले. तसेच, बंद दरवाजाच्या लोकल वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी चर्चा केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



आमदार काशिनाथ दाते यांनी मुंबईतील रेल्वे अपघातांच्या वाढत्या संख्येकडे लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्याला उत्तर देताना सरनाईक यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. रेल्वे प्रवासातील सुरक्षिततेबाबत माहिती देताना सरनाईक यांनी २०१४ आणि २०२५ च्या आकडेवारीची तुलना केली. ते म्हणाले. "२०१४ मध्ये रेल्वे अपघातातील मृतांची संख्या ३ हजार ४२३ इतकी होती, जी २०२५ मध्ये १ हजार १३६ पर्यंत खाली आली आहे. तसेच जखमींची संख्याही ३ हजार २९९ वरून १ हजार ४५ पर्यंत कमी झाली आहे," असे त्यांनी नमूद केले. राज्य सरकार आणि रेल्वे प्रशासन यांच्यातील उत्तम समन्वयामुळेच हे शक्य झाल्याचा दावा त्यांनी केला.

लक्षवेधी दरम्यान आमदार काशिनाथ दाते आणि ज्योती गायकवाड यांनी रेल्वेमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आरक्षित डबा ठेवण्याची मागणी केली. यावर उत्तर देताना, असा निर्णय घेण्याचे अधिकार रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीत असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकार रेल्वेसोबत समन्वय साधून अनेक उपाययोजना राबवित असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. त्याचबरोबर मेट्रोचे जाळे वाढविण्याबरोबरच स्थानिक प्रशासनाच्या लोकल बसेस मुंबई शहरात जास्तीत जास्त सुरु करण्यासही भर दिला जात असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

## महाराष्ट्रात धर्मांतर विरोधी विधेयकाला मंजुरी

■ मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे नितेश राणे यांच्याकडून स्वागत, म्हणाले- राज्यासाठी ऐतिहासिक दिवस

मुंबई (दै. संध्या)

आज महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने धर्मांतर विरोधी विधेयकाला मंजुरी देऊन एक अत्यंत महत्त्वपूर्ण कायदेशीर पाऊल उचलले असून, भाजप आमदार व मंत्री नितेश राणे यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. विधानभवनाबाहेर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या निर्णयाचे स्वागत करताना म्हटले की, हा राज्यासाठी ऐतिहासिक दिवस आहे.

नितेश राणे म्हणाले, आमच्या देवा भाऊंच्या महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचा आणि विविध संघटनांचा संघर्ष आता फळाला आला आहे.
हा नवीन कायदा केवळ मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमधील कायद्यांसारखाच नाही तर काही बाबतीत अधिक कठोर आणि प्रभावी आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर महाराष्ट्रात



धर्मांतराला जबरदस्ती करण्याचा किंवा प्रवृत्त करण्याचा कोणताही प्रयत्न हा अजामीनपात्र गुन्हा मानला जाईल. जबाबदार असलेल्यांना ताबडतोब अटक केली जाईल, असे राणे म्हणाले. नितेश राणे यांनी विधेयकातील तरतुदींवर स्पष्ट करताना म्हटले की, ख्रिश्चन मिशनरी आणि इतर गटांवर आर्थिक मदत, आरोग्यसेवा किंवा शिक्षणाच्या नावाखाली सामूहिक धर्मांतराचे आरोप अनेकदा केले जातात. या कायद्यामुळे आता अशा कारवायांना आळा बसेल. कायदा 'घर वापसी'साठी विशेष तरतुदी आणि मार्ग देखील प्रदान करतो. जेणेकरून स्वेच्छेने त्यांच्या मूळ हिंदू धर्मात परतणाऱ्यांना पूर्ण सरकारी पाठिंबा आणि संरक्षण मिळू शकेल. हा कायदा आपल्या माता-भगिनींच्या फसवणुकी आणि धर्मांतरापासून संरक्षण करेल, असे नितेश राणे म्हणाले. ते म्हणाले, आता महाराष्ट्रात कोणीही धर्मांतर करण्याचे धाडस करणार नाही. घटनात्मक वैधतेच्या प्रश्नाबाबत त्यांनी स्पष्ट केले की मंत्रिमंडळाने यावर सखोल चर्चा केली आहे आणि हा कायदा पूर्णपणे घटनात्मक चौकटीत आहे, ज्याला सर्वोच्च न्यायालयाचाही पाठिंबा आहे, अशी माहिती राणे यांनी दिली.

## राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होणार

मुंबई (दै. संध्या)



■ शिवसेनेकडून ज्योती वाघमारेंना उमेदवारी

■ शरद पवारांनी घरातून भरला अर्ज, तावडे, आठवले, पार्थ पवारांसह महायुतीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

राज्यातील राज्यसभेच्या सात जागांसाठी केवळ सातच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजप-महायुतीकडून सहा आणि महाविकास आघाडीकडून शरद पवार यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. अर्जांची छाननी आणि इतर तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १६ मार्च रोजी याबाबतची अधिकृत घोषणा केली जाईल. गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय हालचालींना वेग आला होता. महायुतीकडून भाजपने चार, राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) एक आणि शिवसेनेने एक असे एकूण सहा अर्ज दाखल केले आहेत. तर महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा एकमेव अर्ज दाखल झाला आहे. प्रकृतीच्या कारणास्तव शरद पवार विधानभवनात उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण केली. महाराष्ट्राच्या निवडणूक इतिहासात घरी जाऊन उमेदवारी अर्ज भरण्याची ही पहिलीच वेळ ठरली आहे.

# राज्यसभेसाठी एकनाथ शिंदेंचे धक्कातंत्र : ज्येष्ठ नेत्यांना डावलून नव्या चेहऱ्याला संधी

मुंबई (दै. संध्या)

राज्यसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांचे अंदाज चुकवत मोठे 'धक्कातंत्र' वापरले आहे. शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला तांत्रिकदृष्ट्या राज्यसभेची एकच जागा येत असताना, उपमुख्यमंत्र्यांनी सोलापूरच्या आक्रमक प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांना मैदानात उतरवले आहे. ज्योती वाघमारे यांनी आपला उमेदवारी अर्ज आज दाखल केला.

महाराष्ट्रातील आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून महायुतीकडून उमेदवारीबाबत चर्चा



सुरू आहेत. भाजपकडून चार उमेदवार देण्यात आल्यानंतर आता शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडूनही उमेदवारांची नावे पुढे येऊ लागली आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून राज्यसभेसाठी प्राध्यापक ज्योती वाघमारे यांचे नाव जाहीर झाले आहे. सुरुवातीला माजी खासदार राहुल शेवाळे यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात होते. मात्र ऐनवेळी त्यांचे नाव मागे पडल्याची माहिती समोर येत असून आता ज्योती वाघमारे यांना राज्यसभेची संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ज्योती वाघमारे यांनी शिवसेना शिंदे गट स्थापन झाल्यापासून पक्षाची वैचारिक भूमिका प्रभावीपणे मांडण्याचे काम केले आहे. विविध राजकीय मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने माध्यमांमध्ये पक्षाची बाजू ठामपणे मांडली आहे. विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत आणि सुषमा अंधारे यांच्याकडून करण्यात येणाऱ्या आरोपांना प्रत्युत्तर देण्याची जबाबदारीही ज्योती वाघमारे यांनी सातत्याने पार पाडली आहे. आक्रमक आणि अभ्यासू वक्तृत्वामुळे त्या शिंदे गटाच्या प्रमुख प्रवक्त्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जातात. ज्योती वाघमारे या फुले-शाहू-आंबेडकर विचारसरणीतून पुढे आलेल्या असून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी सक्रिय काम केले आहे. यापूर्वी त्या काँग्रेस पक्षातही कार्यरत होत्या. त्यांच्याकडे काँग्रेसच्या महिला शहर अध्यक्षाची जबाबदारी होती. प्रणिती शिंदे यांच्या प्रचार सभांचे सुत्रसंचलन, संयोजन देखील त्या करीत होत्या. दरम्यान, सोलापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याविरोधात मजबूत वैचारिक आणि राजकीय आव्हान उभे करण्याच्या दृष्टीनेही ज्योती वाघमारे यांना संधी देण्यात येत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतरच या चर्चांना अंतिम स्वरूप मिळणार असले तरी शिंदे गटाकडून ज्योती वाघमारे यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता सध्या राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. सोलापुरातल्या आंबेडकरी चळवळीत सक्रिय काम करणारा चेहरा म्हणून प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांची ओळख आहे. प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचे वडील नागनाथ वाघमारे हे दलित पँथरचे कार्यकर्ते होते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नागनाथ वाघमारे यांनी हॉटेलमध्ये वेटरचे तसेच बांधकाम मजूर म्हणून काम केले. चळवळीतील कामाची पोचपावती म्हणून सोलापूरमधील नागरिकांनी सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत नागनाथ वाघमारे यांना नगरसेवक म्हणून निवडून दिले होते. प्रा. डॉ. ज्योती वाघमारे सुरुवातीच्या काळात मानवी हक्क अभियान, विद्रोही संस्कृतिक चळवळ, आंबेडकरी चळवळीतून आपल्या कामाला सुरुवात केली. प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी काहीकाळ वृत्त निवेदिका म्हणून काम केलं. पुढे उच्चशिक्षणाचा उपयोग सामाजिक जनजागृतीसाठी व्हावा, या उद्देशाने प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानं दिली.

## संपादकीय

# अस्वस्थ दुबईच्या रस्त्यांवर सध्या वातावरण काय ?

पश्चिम आशिया किंवा अरब जग (मिडल इस्ट) म्हणजे अशांत आणि अस्थिर परिसर, असा आपला एक सर्वसाधारण समज आहे. अरब जग हे उत्तर आफ्रिकेपासून आखाती देशापर्यंत आहे. आखाती देश हा त्यातला एक भाग. हे देश इतरांपेक्षा वेगळे असण्याची मुख्य कारणं तीन - बहुतांश देश तेलसमृद्ध आहेत. मोठ्या प्रमाणावर परदेशी नागरिक राहतात आणि अलीकडे हे देश पर्यटन, तंत्रज्ञान, गुंतवणूक याला महत्त्व देत आहेत. इथल्या जनजीवनात स्थैर्य आणि शिस्त याला महत्त्व आहे. व्यवस्थेचा धाक आणि कायद्याचा आब हे इथे नियमित पाहायला मिळतं. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण या संघर्षात या देशांवर हल्ले झाल्याने ते चर्चेत आले आहेत. अशा संघर्ष काळात व्यवस्थेकडून उचलली जाणारी पावलं सर्वसामान्य नागरिकांना, पर्यटकांना आणि कामानिमित्त इथे स्थायिक झालेल्या लोकांना धीर देणारी, सुरक्षेबाबतचा दिलासा देणारी आहेत.

गेली अनेक वर्षे मी बहारीनमध्ये राहते. संघर्ष सुरू झाला, त्यादरम्यान मी दुबईला आले होते आणि सध्या दुबईमध्येच आहे. अशा युद्धजन्य काळात चिंता, भीती, काळजीचं प्राबल्य असतं. अडकलेल्या पर्यटकांची, त्यांच्या कुटुंबीयांची चिंता लक्षात घेऊन संयुक्त अरब अमिरातीच्या सरकारने तातडीने पावलं उचलली. परिस्थिती सामान्य होईपर्यंत इथे निश्चिंत मनाने राहता यावं, यासाठी निर्णय घेतले. अडचणीत सापडलेल्यांची लूट होऊ नये, याची काळजी घेतली. तेल हा या देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचा समज चुकीचा नसला, तरी या देशांच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात पर्यटनाचा मोठा हातभार आहे. जगभरातून आलेले पर्यटक मायदेशापासून दूर युद्धाच्या छायेत अडकतात, तेव्हाच 'आदरातिथ्या'ला महत्त्व द्यायला हवं, हे ओळखून पावलं उचलण्यात आली. आणीबाणीची परिस्थिती कशी हाताळली जाते, यावर संबंधित देशाची प्रतिमा तयार होते. त्यादृष्टीने पाहिलं, तर धीरोदात्तपणाचा एक कौतुकास्पद आदर्श इथल्या सरकारने घालून दिला आहे. इथल्या मेट्रो सुरू आहेत. रस्त्यांवर टॅक्सी धावत आहेत, मॉल्स आणि इतर सगळी महत्त्वाची ठिकाणं सुरू आहेत. यूएईच्या शासकांनी इथल्या दुबई मॉलला भेट दिली. तिथल्या सामान्य नागरिकांना त्यांनी धीर दिला. त्यातून लोकांमध्ये सकारात्मक संदेश गेला.

मी जिथे राहते तो बहारिन हा भौगोलिकदृष्ट्या इराणच्या अधिक जवळचा देश आहे. तिथल्या माझ्या मित्रमंडळींमध्ये सुरुवातीच्या दोन दिवसांमध्ये भीती होती. पण, सरकारकडून आवश्यक अलर्ट्स जारी करणं, लोकांना सुरक्षित स्थळी हलवणं, त्यांना योग्य माहिती योग्य पद्धतीने पुरवणं, याबाबतीत व्यवस्था व्यवस्थित काम करत आहे. शिस्त आणि कायद्याचा धाक हा इथल्या व्यवस्थेच्या मुळाशी आहे. अशा परिस्थितीत काय उपाययोजना करायच्या हे सरकारने अधिकृतपणे कळवलं, तर नागरिक सहकार्य करतात. या देशांमध्ये नियमांचं उल्लंघन कुणी करत नाही. तसं केल्यास आकारला जाणारा दंड कमावलेलं सगळं गमवावं लागेल एवढा जबर असतो. लोकसंख्या, क्षेत्रफळाच्या दृष्टीने हे देश लहान आहेत. त्यामुळे 'त्यांना न जमायला काय झालं?' असा एक सूर आपल्याकडे दिसतो. पण, इथली व्यवस्था अशी असण्यात इथल्या नागरिकांचा 'सिव्हिक सेन्स'ही हातभार लावतो. देशातले कायदे फक्त कागदावर राहिले नाहीत, तर दैनंदिन जीवनातल्या अनेक समस्या दूर होतात, हे या देशांकडे पाहिल्यावर लक्षात येतं.



## संस्कृत सुभाषित

अनिशश्चावमानी च स शीघ्रंभ्रश्यते श्रिय:।।
(सौप्तिकपर्व, अध्याय २, २५, महाभारत)
अर्थ – हातात सत्ता नसतानाही जो दुसऱ्याचा उपमर्द करतो तो ऐश्वर्यापासून लवकरच भ्रष्ट होतो.

## गुरु वचन

### भक्ताचे समाधान

दक्षिण भारतात एक शेतकरी राहात होता. तो शेतीची कामे करण्यासह भक्तीमय पदेही रचत असे तसेच आजारी व निराधार लोकांची सेवाही करत होता. भगवान श्रीकृष्ण त्याचे आराध्यदेवत होते. भगवान श्रीकृष्णांच्या लिला असलेला ग्रंथ श्रीमद भागवताचे लोकभाषेत अनुवाद करायचा असे त्याने ठरविले होते. ज्यामुळे येथील लोक प्रभूंच्या लिलांचा आनंद घेऊ शकतील.

शेतकऱ्याने कितीतरी वर्षाच्या अथक परिश्रमाने भागवताचा अनुवाद पुर्ण केला. एका दिवशी एक विद्वान संत त्याच्या नगरीत प्रवचन देण्यासाठी आले. त्यांना शेतकऱ्यांच्या भक्तीरचना आवडलेल्या होत्या. त्यांनी भागवताच्या अनुवादाचे बाड पाहिले. तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले ते म्हणाले की, या अनुवादाची भाषा समर्थ आणि सक्षम अशी आहे. तू अशा उत्कृष्ट भाषेचा वापर कसा काय केला. त्यांनी त्याला सल्ला दिला की या राज्यातील राजाला तू हा ग्रंथ भेट दे. ते खुप धार्मिक वृत्तीचे आहेत. शिवाय माझे मित्रही. माझ्या सांगण्याने ते तुला या ग्रंथासाठी योग्य असे बक्षीसही देतील. बक्षीसस्वरुपात तुला अनेक गावांची जहागिरीसुद्धा देऊ शकतात. भक्त कवी शेतकऱ्याने सांगितले, मी आपल्या शेतात कष्ट करून पिकविलेल्या पिके विकून माझ्या कुटुंबियांचे पालन पोषण करतो. यापेक्षा जास्त असलेले धन, संपत्ती माझ्या भक्तीमध्ये बाधा उत्पन्न करेल. व मी हा ग्रंथ भगवानांच्या पावनचरित्राला सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी रचला आहे. धनदौलत व संपत्तीसाठी नाही. संत मग भक्त शेतकऱ्याची विरक्तीची भावना पाहुन आश्चर्यचकित झाले.

## उपदेशकथा

### क्रोध

एक वृद्ध संन्यासी नदीवर स्नान करून मठाकडे जात होता. तोंडाने हरिओमचा जप चालू होता. रस्त्यामध्ये एका भिकाऱ्याचा स्पर्श त्याला झाला. संन्यासी रागाने भडकला व ओरडला, अरे, तू आंधळा आहेस का? रस्त्याने नीट पाहून चालता येत नाही? आता मला पुन्हा स्नान करायला पाहिजे ना! तो भिकारी एका साधूचा शिष्य होता. त्याने संन्याशाला हात जोडले आणि म्हणाला, स्वामी ! स्नान तर मला करायला पाहिजे. स्वामींनी विचारले, तुला कशासाठी स्नान करायला हवे? भिकारी उत्तरला, क्रोध हा सर्वांत अपवित्र आहे. तो आपल्या अंतरी घुसला आणि आपण त्याला माझ्यावर फेकला म्हणून मला स्नान करून पवित्र व्हायला पाहिजे. ते बोलणे ऐकून संन्यासी लाजेने विरघळून गेला.

कथा उपदेश : आपल्या षडरिपुंवर विजय मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | चन्द्र:तुला२२:१८:२४ |
| ६ मार्च २०२६ | हिजरी सन् – १४४५ |
| शुक्रवार | मुस्लिम मास – रमजान |
| विक्रम संवत्– २०८२ | तारीख – १६ |
| श्रावणशके संवत्– १९४७ | विशेष |
| संवत्सर – विश्वावसूनाम | छत्रपती शिवाजी महाराज |
| अयन– उत्तरायणारंभ | जयंती (तिथीप्रमाणे) |
| मास– फाल्गुन | अंगारक संकष्ट चतुर्थी |
| ऋतु– सौर वसंत | चंद्रोदय ०९.१६ |
| कृष्ण पक्ष | मुंबई २१.४४ |
| तिथि:तृतीया १७:५३:३९ | अकोला २१.०३ |
| नक्षत्र:हस्त ०९:२९:३७ | अमरावती २१.०० |
| योग:गण्ड ०७:०५:०६ | अहमदनगर २१.११ |
| योग:वृद्धि ३०:५१:५२+ | अलिबाग २१.१८ |
| करण:विष्टि १७:५३:३९ | धराशिव २१.०४ |
| करण:बव ३०:३१:२९+ | औरंगाबाद २१.०९ |
| सूर्य:कुम्भ | कोल्हापुर २१.११ |

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | | | |
| | | 6 | 2 | | 1 | | 7 | 8 |
| 7 | 1 | 3 | | 8 | | | 5 | 9 |
| | 9 | | | | 2 | | | 6 |
| | | | 5 | 9 | 3 | | | |
| 1 | | | 6 | | | | 9 | |
| 3 | 2 | | | 6 | | 9 | 4 | 5 |
| 4 | 5 | | 3 | | 9 | 6 | | |
| | | | | | | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८७७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 6 | 5 | 8 | 4 | 7 | 9 | 3 |
| 8 | 5 | 4 | 7 | 3 | 9 | 2 | 6 | 1 |
| 7 | 3 | 9 | 1 | 2 | 6 | 4 | 5 | 8 |
| 3 | 4 | 5 | 9 | 1 | 7 | 6 | 8 | 2 |
| 1 | 9 | 8 | 4 | 6 | 2 | 3 | 7 | 5 |
| 6 | 2 | 7 | 3 | 5 | 8 | 9 | 1 | 4 |
| 5 | 8 | 2 | 6 | 7 | 3 | 1 | 4 | 9 |
| 4 | 7 | 3 | 8 | 9 | 1 | 5 | 2 | 6 |
| 9 | 6 | 1 | 2 | 4 | 5 | 8 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४४७ – निकोलस पाचवा पोपपदी.
- १८३६ – टेक्सासचे प्रजासत्ताक – अलामोचा प्रतिकार थांबला. मेक्सिकोच्या १,६०० सैनिकांविरुद्ध १३ दिवस किल्ला लढवणारे १८९ टेक्सासचे सैनिक पराभूत.
- १८६९ – दिमित्री मेन्डेलीफने मूलभूत घटकपदार्थांची आवृत्तिक सारणी प्रकाशित केली.
- १९०१ – जर्मनीच्या कैसर विल्हेम दुसऱ्यावरील प्राणघातक हल्ला निष्फळ.
- १९४० – रशिया व फिनलंडमध्ये शस्त्रसंधी.
- १९५३ – जोसेफ स्टालिननंतर जॉर्जी मॅक्सिमिलानोविच रशियाच्या अध्यक्षपदी.

### राष्ट्रीय

- २००८ – फोर्ब्स मासिकाने सर्वाधिक श्रीमंत देशांची यादी जाहीर केली. यादीत भारताने तिसरा क्रमांक पटकावला.
- २००८ – मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने एक देशाविरुद्ध सर्वाधिक धावा काढण्याचा सर डॉन ब्रॅडमन यांचा विश्वविक्रम तोडला.
- २००८ – जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तीच्या यादीत पहिल्या दहा नावांमध्ये भारताचे लक्ष्मी मित्तल, मुकेश अंबानी, अनिल अंबानी, के. पी. सिंग यांचा समावेश करण्यात आला.

### जन्म

- १७०६ – जॉर्ज पोकॉक, इंग्लिश दर्यासारंग यांचा जन्म.
- १९०३ – नागाको, जपानी साम्राज्ञी यांचा जन्म.

### निधन

- १७५४ – हेन्री पेल्हाम, इंग्लंडचे पंतप्रधान यांचे निधन.
- १८९९ – व्हिक्टोरिया कैउलानी, हवाईची राजकुमारीचे निधन.

## : SMS :

7 Angels come to me & asked for the most Intelligent Smart Nice Sweet Well Behaved Well Groomed person So i Gave them your address.
DEKHA
Kaisa oollu banaya unko

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३ | २३.६ |
| अहमदनगर | ३२.५ | २१.४ |
| अकोला | ३५.४ | २६.२ |
| अमरावती | ३५.४ | २५.४ |
| बीड | ३६ | २३.८ |
| भंडारा | ३४.८ | २३.४ |
| बुलढाणा | ३०.८ | २०.३ |
| चंद्रपूर | ३६ | २६.८ |
| चेन्नई | ३५ | २६ |
| नवी दिल्ली | ३१.९ | २२.८ |
| धुळे | ३४.२ | २३.७ |
| गोंदिया | ३३.१ | २३.६ |
| जळगाव | ३५.९ | २३.५ |
| कोल्हापूर | ३३.७ | २४.३ |
| लातूर | ३३.५ | २५.१ |
| मुंबई | ३६.३ | २७.६ |
| नागपूर | ३४.७ | २४.३ |
| नांदेड | ३५.३ | २४.४ |
| नंदूरबार | ३३ | २४ |
| नाशिक | ३३.६ | २३.३ |
| पुणे | ३२.४ | २३.६ |
| पंढरपूर | ३४.२ | २५.८ |
| सातारा | ३३.८ | २१.१ |
| सांगली | ३४.७ | २४.९ |
| सोलापूर | ३४.७ | २५.९ |
| वर्धा | ३६.३ | २६.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
आपली महत्वकांक्षा आज आपल्याला सफलता मिळवून देणार आहे.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:दक्षिण
आपली कामे वेळेतच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. आरोग्याची चिंता राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पुर्व
गृहपयोगी वस्तू खरेदी कराल. व्यापारात विस्तारासाठी जास्त प्रयत्न करावे लागतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा:पुर्व
पराक्रमात वाढ होईल. काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. निष्कारण कोणत्याही वादात गुंतु नका.

**मिथुन :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
विचार पूर्वक काम हाती घ्या. कामाच्या ठिकाणी महत्व मिळून त्याचा प्रभाव वाढेल.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर
सामाजिक कार्यक्रमात सक्रीय रहाल. आनंदाचे वातावरण राहील. व्यापारात नवीन फायदेशीर प्रस्ताव मिळतील.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पुर्व
खर्चामध्ये वाढ होईल त्यामुळे चिंता वाढेल. आखलेल्या योजनेत आडथळा येईल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : दक्षिण
अचानक लाभ होण्याचे योग. प्रिय व्यक्ती भेटल्याने आनंदी रहाल.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारामध्ये महत्वाचे सौदे होतील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**कुंभ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पुर्व
कौटुंबिक सहकार्य लाभेल त्यामुळे कामात उत्साह राहील.केलेल्या प्रयत्नांना यश मिळेल. शत्रुपासून सावध रहा.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पुर्व
कामामध्ये मनासारखे परिणाम दिसून येतील. आपल्या बुद्धी चातुर्याचे अधिकारी प्रशंसा करतील.

**मीन :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
बुद्धीच्या जोरावर आपली समस्या दूर होऊ शकते. व्यापारात यश मिळण्याचे योग आहेत. कौटुंबिक समृध्दीत वाढ.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७८



### आडवे शब्द

१. पुरी फजिती, बोऱ्या
४. नुकतीच आशिया करंडकाचा अंतिम सामना या दोन देशात झाला
९. सापाने टाकलेली त्वचा
११. पृथ्वी
१३. अंत:करण
१४. मोराचे ओरडणे, मोरोपंतांचा काव्यसंग्रह
१६. स्पष्टवक्ता
१७. रम्य
१९. श्वासाचा अवयव
२०. आत काहीही नसलेले, फोल
२१. एक दातेरी हत्यार
२३. स्वच्छ
२४. वृक्ष, झाड
२६. टरफलासहित तांदूळ
२७. सरस, अधिक श्रेष्ठ
३०. पदोपदी
३२. धडधड
३४. ममता, प्रेम, धन
३५. आंब्याची पोळी
३६. सर्वस्व
३८. आजच्या आधीचा दिवस
३९. सदोदित
४१. चेहरा, मुख
४२. अदृश्य
४३. सोने
४५. परिस्थिती
४७. निवासस्थान
४८. भीती
५०. कारस्थान
५१. अर्धवर्तुळाकृती
५४. गाय
५५. भाषांतर करणारा
५७. खडकाची जमीन
५९. पोपट, ६०. लेखणी
६१. शहर, गाव
६३. प्रवासातील टप्पा
६४. पातळ खांब
६५. कर्जाचा बोजा, वजन
६६. माफी, ६७. कपाळभर लावलेले कुंकू
६८. घराणे
७१. अमली, कैफी
७२. वेदना
७३. बांगड्या भरण्याचा व्यवसाय करणारा
७५. माणशी प्रमाण
७७. नवा कोरा
७९. जमीनदोस्त
८०. मखर

### उभे शब्द

१. नेस्तेज, पांढरेधोप
२. चुणचुणीत, सुंदर मुलगी
३. नदीचा काठ, बाण
५. सुंदर तरुणी
६. पुत्र, मुलगा
७. रावण, लंकेचा राजा
८. चुलता
१०. तात्काळ, लगेच कारवाई
१२. रेचक
१५. पहिला ऋतू
१८. 'भाजे' लेणी या गावाजवळ आहेत
१९. अमेरिकेचे अंतराळ संशोधन केंद्र
२०. लाटण्याच्या साथीदार
२१. पाण्याला आलेली उकळी
२२. रंग
२५. भारतीय चलन
२६. वर्षानुवर्षे
२८. हालचाल
२९. पवित्र, साखरेचे दाट पाणी, ३१. खोदकाम
३२. मेंढपाळ
३३. प्रयत्न
३४. वाजवी, योग्य
३७. हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव
३८. कावळा
३९. मनाला टोचणारे दु:ख
४०. जळजळीत, जाळणारे
४४. फायदा, तोटा
४५. सोने
४६. पत्नी, सुंदर स्त्री
४९. पहारेकरी
५०. पाऊल (हिंदी)
५२. प्रमाणपत्र
५३. विपत्तीची कहाणी
५६. एक द्विदल धान्य
५८. अंजनाचा एक प्रकार
५९. गवंडी
६१. मवाळ धोरण
६२. रक्षण करणारा
६३. जुगाराचा एक प्रकार
६४. स्तुती
६७. मळलेली
६९. नवरा (ग्रा.)
७०. पुरुष
७२. पिकांवरील एक रोग, करपलेला भाग
७४. शर्करा
७६. मस्तक
७७. सत्त्व
७८. अंधार

**जम्बो शब्दकोडे क्र. ८७७ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालहलाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

उभे उत्तर : १.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.




महिलांसाठी सुरक्षित डिजिटल संवादाला नवा अर्थ देण्यासाठी

## एफआरएनडी कडून 'सुरक्षित कन्व्हर्झेशन्स' लाँच

**पुणे (दै. संध्या) :**

भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची पुढची लाट टियर २-४ शहरांमधून ऑनलाइन येत आहे. अशा वेळेस विशेषत: सार्थक संपर्काच्या शोधात असणाऱ्या महिलांच्या दृष्टीने सुरक्षितता हा डिजिटल विश्वासाचा निर्णायक घटक म्हणून पुढे येत आहे. भारताचा अवतार-आधारित ऑडिओ सोशल डिस्कव्हरी प्लॅटफॉर्म आणि इंटरॅक्ट ग्रुपचे प्रमुख उत्पादन असलेल्या एफआरएनडी ने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'सुरक्षित कन्व्हर्झेशन्स' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून या प्लॅटफॉर्मच्या महिला-प्रथम सुरक्षा डिझाईनवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या मोहिमेच्या माध्यमातूनडिजिटल सुरक्षिततेबद्दल जागरूकता वाढवणे आणि या प्लॅटफॉर्मवर महिलांसाठी आदरयुक्त, सुरक्षित संवादाची संस्कृती निर्माण करणे हे एफआरएनडी चे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, कंपनी सुरक्षित ऑनलाइन वर्तन, धोके ओळखणे आणि प्लॅटफॉर्मच्या सुरक्षा वैशिष्ट्यांचा जास्तीत जास्त वापर करणे यांविषयी महिला वापरकर्त्यांना शिक्षित करण्यासाठी नियमित इन-अ‍ॅप सत्रे आयोजित करणार आहे. याशिवाय एफआरएनडी वापरकर्त्यांना जेव्हा गरज असेल तेव्हा रिअल-टाइम समर्थन आणि मार्गदर्शन पुरविण्यासाठी २४ x ७ टोल-फ्री हेल्पलाइन सुरू करणार आहे. अधिक सुरक्षित आणि अधिक समावेशक डिजिटल इकोसिस्टम तयार करण्याच्या भारत सरकारच्या दृष्टिकोनाशी ही मोहीम सुसंगत आहे. टियर २ ते ४ बाजारपेठेतील महिलांना ज्ञान आणि सुलभ मदत प्रणालींसह सुसज्ज करण्याचा ती प्रयत्न करणारी आहे जेणेकरून विश्वास हा प्रत्येक संवादाच्या केंद्रस्थानी राहील. एफआरएनडीची निर्मिती भारतीय वापरकर्त्यांसाठी करण्यात आली असून सुरक्षितता ही या उत्पादनाच्या आर्किटेक्चरच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. या प्लॅटफॉर्मवर सध्या दररोज जवळजवळ दहा लाख संभाषणे केली जातात, त्यासाठी व्हिडिओ, ऑडिओ आणि चॅट संवादांचे निरीक्षण करणारी १०० सदस्यांची मॉडरेटेशन टीम आणि रिअल-टाइम एआय सिस्टम यांचा आधार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### समितीच्या बैठकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

पुणे (दैनिक संध्या) : विभागीय अधिस्विकृती समितीच्या बैठकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार हरिष पाटणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार आणि माध्यम क्षेत्रासाठी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यांच्या कार्याची आठवण करून देत उपस्थित सदस्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी समितीचे सदस्य सचिव तथा विभागीय उपसंचालक डॉ. किरण मोघे, सदस्य ज्येष्ठ पत्रकार सुनीत भावे, गोरख तावरे, चंद्रशेन जाधव, पुणे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के तसेच सातारा जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### वाहन क्रमांक आरक्षणासाठी 6 मार्चपासून फेसलेस सेवा सुरु

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे नवीन वाहनांसाठी आकर्षक, पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्याची फेसलेस (ऑनलाईन) सेवा 6 मार्च 2026 रोजी दुपारी 12 वाजल्यापासून सुरू होणार आहे. ही सेवा पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात कार्यान्वित असून, कार्यालयामध्ये ऑफलाईन पद्धतीने शुल्क स्वीकारले जाणार नाही. नागरिकांनी ही सेवा घरबसल्या https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावरून वापर करता येईल. फेसलेस सेवा कार्यान्वित असून, अर्जदार आधार लिंक मोबाईल क्रमांकाद्वारे ओटीपी घेऊन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. नव्याने सुरू होणाऱ्या 'एमएच12झेडजे' मालिकेतील पसंतीचे नोंदणी क्रमांक अर्जदारांना आरक्षित करता येतील. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

### बारामती शासकीय वैद्यकीय महा विद्यालयाच्या नामांतराला सरकारची मान्यता

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र सरकारने बारामती येथील सरकारी वैद्यकीय रुग्णालय आणि सरकारी आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाचे नाव बदलण्यास मान्यता दिली आहे. या संस्थांना आता दिवंगत अजित पवार यांचे नाव देण्यात येईल. एकदा निर्णय लागू झाल्यानंतर संबंधित वेबसाइट्स, अधिकृत रेकॉर्ड, रजिस्टर, सूचना फलक आणि सरकारी पत्रव्यवहारात आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील. या बदलांची जबाबदारी मुंबईतील वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे आयुक्त आणि संबंधित संस्थांच्या डीनवर सोपवण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण आणि औषध विभागाने जानेवारी २०१३ मध्ये बारामती येथे १०० आसनांचे सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि ५०० खाटांचे रुग्णालय मंजूर केले. त्यानंतर जुलै २०२१ मध्ये १०० विद्यार्थी क्षमतेचे आयुर्वेद महाविद्यालय आणि १०० खाटांचे आयुर्वेद रुग्णालय सुरू करण्यात आले. मे २०२३ च्या सरकारी आदेशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावावरून या वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती' असे ठेवण्यात आले. आता हे नाव 'स्व. अजित (दादा) पवार' असे बदलण्यात आले आहे. नाव बदलण्याच्या या निर्णयामुळे राजकीय आणि सामाजिक वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

# 'वैकुंठ यात्री' उपक्रम : शंभरहून अधिक जणांना दिला अखेरचा निरोप

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे शहराला सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जातं. या सांस्कृतिक राजधानीमध्ये अनेक संस्था, संघटना आणि वैयक्तिक माध्यमातून सामाजिक काम केलं जातं. शिक्षण आणि नोकरीनिमित्त पुण्यातील अनेक तरुण-तरुणी देशाबाहेर जातात. मागील काही वर्षांपासून पुण्यात हे प्रमाण वाढलं आहे. त्यामुळं एकुलता एक मुलगा-मुलगी शिक्षणसाठी/कामासाठी बाहेर गेल्यामुळं ज्येष्ठ आई-वडिलांवर उतार वयात एकटं राहण्याची वेळ येते. आपली मुलं परदेशात गेल्यामुळं घरात एकटं राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. काहीवेळा शेजारचे लोक मदतीसाठी पुढं सरसावतात. परंतु, दरवेळी ते येतीलच असं नाही. अचानक उद्भवलेल्या समस्येवेळी मदतीसाठी कोणीही पुढं न आल्याच्या अनेक घटना पुणे शहरात घडल्या. हीच बाब लक्षात घेत पुण्यातील केळकर काकांनी 'वैकुंठ यात्री' ही मोहीम सुरू केली. या मोहिमेच्या माध्यमातून केळकर काकांनी आतापर्यंत शंभरहून अधिक जणांना निरोप दिला आहे.



**अशी झाली 'वैकुंठ यात्री' मोहिमेला सुरुवात : 2023** साली नितीन केळकर आणि त्यांच्या मित्रांनी एकत्र येत 'वैकुंठ यात्री' ही मोहीम सुरू केली.

या मोहिमेअंतर्गत 'वैकुंठ यात्री' संस्था अंत्यविधीसाठी लागणारं सर्व सेवा पुरवते.

यामध्ये शववाहिका, डॉक्टर, डेथ सर्टिफिकेट, पास काढणे अशी मदत केली जाते. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना संबंधित घटनेबद्दल कळवणं हे काम सुद्धा संस्थेकडून केलं जातं. अशा कामांसाठी लागणारं मनुष्यबळ संस्थेकडं उपलब्ध आहे. वैकुंठ यात्री संस्था नागरिकांना 24 तास उपलब्ध आहे.

ज्या ज्येष्ठ व्यक्तींची मुलं शिक्षणासाठी किंवा कामानिमित्त शहराबाहेर किंवा परदेशात आहेत, ज्या नागरिकांचा संपर्क कमी आहे किंवा अचानक उद्भवलेल्या अडचणीवेळी मदत करायला कोणी येऊ शकत नाही, नातेवाईक लांब आहेत आणि वयोवृध्द, एकटे किंवा हतबल असलेले नागरिक वैकुंठ यात्री मोहिमेमध्ये आगावू मोफत नोंदणी करू शकतात. वैकुंठ यात्री संस्थेत नोंदणी केल्यानंतर कठीण प्रसंगी घरातील व्यक्तींच्या मदतीसाठी ही संस्था मोफत मदत करते.

**ती घटना पाहून रात्रभर झोप लागली नाही :** "'वैकुंठ यात्री' या उपक्रमाची संकल्पना 10 जून 2023 ला एका हृदयस्पर्शी घटनेतून जन्माला आली. आपल्याच सोसायटीत राहणाऱ्या एका परिचित व्यक्तीच्या निधनानंतर त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी आणि खांदा देण्यासाठी केवळ तीनच व्यक्ती उपस्थित होत्या. खांदा देण्यासाठी चौथा माणूसही उपलब्ध नव्हता, हे पाहून मनाला प्रचंड वेदना झाल्या.

त्या रात्री या घटनेच्या विचारानं झोप लागली नाही. समाजात अशा अनेक व्यक्ती किंवा कुटुंबे असतील ज्यांच्याकडं अंत्यविधीसाठी पुरेसं मनुष्यबळ नाही, हे लक्षात घेऊन काहीतरी करण्याची जिद्द निर्माण झाली. ही संकल्पना मित्रांससोर मांडली आणि त्यातूनच 'केळकर काका फाउंडेशन'च्या माध्यमातून 'वैकुंठ यात्री' हा उपक्रम सुरू झाला. ज्यांच्या घरी मनुष्यबळाचा अभाव आहे किंवा काही कारणास्तव अंत्यविधीसाठी मदतीची गरज आहे, अशा ठिकाणी 'वैकुंठ यात्री'चे स्वयंसेवक आपलं हातातील काम बाजूला ठेवून धावून जातात. मृत व्यक्तीला सन्मानानं अखेरचा निरोप मिळावा आणि शोकाकुल कुटुंबाला आधार मिळावा," हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे," अशी माहिती नितीन केळकर यांनी दिली.

### 'वैकुंठ यात्री' मोहिमेतून कोणत्या सुविधा मिळतात?

"वैकुंठ यात्री" ही संस्था केवळ अंत्यविधीसाठी मदतच करत नाही, तर त्या कठीण प्रसंगी कुटुंबाला लागणारी सर्व तांत्रिक आणि भावनिक सेवा मोफत पुरवते. रुग्णालयातून मृतदेह घरी नेण्यासाठी ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करणं, डेथ सर्टिफिकेट (मृत्यूचा दाखला) मिळवणं आणि ६० वर्षांवरील व्यक्तींच्या अंत्यविधीसाठी आवश्यक असणाऱ्या शासकीय परवान्यांची कायदेशीर पूर्तता करणं यासारखी महत्त्वाची कामं संस्था पार पाडते. कुटुंबातील जवळच्या आणि लांबच्या सर्व नातेवाईकांना फोन करून घटनेची कल्पना देणं, त्यांच्याशी स्पष्ट संवाद साधून सर्वांच्या संमतीने अंत्यदर्शनाची वेळ निश्चित करणे ही जबाबदारी संस्था उचलते. सर्वांचं अंत्यदर्शन झाल्यानंतर, मृत व्यक्तीला सन्मानानं स्मशानभूमीकडे नेलं जातं," अशी माहिती नितीन केळकर यांनी दिली.

**वैकुंठ यात्री संस्था नेमकं काय काम करते? :** 'वैकुंठ यात्री' ही संस्था अंत्यविधीसाठी लागणारी सर्व सेवा पुरवते. म्हणजे नेमके काय करते? तर रुग्णवाहिकेमधून हॉस्पिटलला नेणं, डेथ सर्टिफिकेट मिळवणं, साठ वर्षांवरील मृत व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी परवाना मिळवणं इत्याही कागदपत्रांची पूर्तता करणे. तसंच त्यांच्या सर्व नातेवाईक मंडळींना फोन करून कळवणे, त्यांना स्पष्ट शब्दात कल्पना देणे आणि सर्वानुमते एक वेळ ठरवून सर्वांचे अंत्यदर्शन झाल्यानंतर वैकुंठ स्मशानभूमिकडे मृतदेह घेऊन जाणे. ज्या व्यक्तींकडे, कुटुंबाकडे मनुष्यबळ नाही, घरातील लोक-मुलंबाळं परदेशात आहेत किंवा बाहेरगावी आहेत किंवा ज्या कुटुंबाचा जनसंपर्क कमी आहे तसंच वयोवृद्ध आहेत, एकटे आहेत, हतबल आहेत अशा सर्व स्त्री पुरुषांसाठी उपयुक्त अशी सेवा असून ते 'वैकुंठ यात्री' मध्ये आगावू आपली नोंदणी करुन स्वतःला सुरक्षित करु शकतात. आपली ही सेवा 24 तास वर्षाचे 365 दिवस सुरू असते. मागच्या चार वर्षात साधारण 115 व्यक्तींना या उपक्रमाअंतर्गत सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. हे सर्व पूर्णपणे मोफत आहे. ही सेवा देत असताना अनेक चांगले वाईट असे दोन्ही प्रकारचे अनुभव आम्हाला पाहायला मिळाले पण आम्ही समाजाची सेवा करायचं ठरवलं आणि त्यानुसार आम्ही काम करतो असं नितीन केळकर यांनी सांगितलं.

## ज्येष्ठांसाठी जी. पी. सहस्त्रबुद्धे चषक कॅरम स्पर्धा; प्रथम आठ विजेत्यांना रोख बक्षिसे

**पुणे (दै. संध्या) :**

पटवर्धनबाग येथील एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संघातर्फे पुणे शहरातील ६० वर्षांवरील महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिकांसाठी जी. पी. सहस्त्रबुद्धे चषक कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १२, १३ व १४ मार्च रोजी संस्थेच्या हॉलमध्ये होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन १२ मार्च रोजी सकाळी ९.४५ वाजता होणार असून स्पर्धा बाद पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेतील पहिल्या आठ विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक ५,००० रुपये, द्वितीय ४,००० रुपये, तृतीय ३,००० रुपये, चतुर्थ २,००० रुपये, तर पाचव्या ते आठव्या क्रमांकापर्यंत प्रत्येकी १,००० रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ज्येष्ठांनी ८ मार्चपर्यंत पंकज कुलकर्णी (९०११०७२९५०) किंवा शिरीष



जोशी (९८२२८४३१०६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी स्पर्धा प्रमुख सुनील शेजवलकर, प्रमुख पंच सुनील वाघ आणि राजकुमार ठाकूर हे काम पाहणार असून त्यांना पंकज कुलकर्णी व शिरीष जोशी सहकार्य करणार आहेत. शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी या कॅरम स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आनंद घ्यावा, असे आवाहन माजी अध्यक्ष अजित गोखले, संघाच्या अध्यक्ष डॉ. अलकनंदा भानू, कार्याध्यक्ष विजय इटक्याल, कोषाध्यक्ष जयंत मुळ्ये, कार्यवाह प्राजक्ता मोघे आणि सहकार्यवाह स्मिता देशपांडे यांनी केले आहे.

## पुण्यात रेडी रेकनर दरांमध्ये प्रस्तावित १०% वाढ तात्काळ रद्द करावी

**पुणे (दै. संध्या) :**

■ AMCCIE ची ठाम मागणी

आर्थिक वर्ष 2026-27 साठी पुण्यात राज्याच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून रेडी रेकनर दरांमध्ये 10 टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रस्तावाला अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) कडून तीव्र आणि ठाम विरोध करण्यात आला आहे.

AMCCIE चे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, सध्या जमीन, सिमेंट, स्टील, मजुरी तसेच इतर बांधकाम साहित्याच्या किमतींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे घरांच्या किंमती आधीच मोठ्या प्रमाणात वाढल्या असून सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंबे आणि तरुणांसाठी स्वतःचे घर खरेदी करणे अत्यंत कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत पुण्यात



रेडी रेकनर दरांमध्ये आणखी 10 टक्के वाढ केल्यास मुद्रांक शुल्क व मालमत्ता व्यवहाराचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढेल आणि घर खरेदीचे स्वप्न सर्वसामान्यांसाठी आणखी दूर जाईल.

ते पुढे म्हणाले की, पुणे हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे औद्योगिक व आयटी केंद्र असून रिअल इस्टेट आणि बांधकाम क्षेत्र हे शहराच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहे. या क्षेत्रातून लाखो लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळतो. मात्र रेडी रेकनर दरांमध्ये वारंवार वाढ केल्यामुळे मालमत्ता व्यवहारांवर नकारात्मक परिणाम होतो, गुंतवणूक कमी होते आणि बाजारपेठेतील गती मंदावते.

या पार्श्वभूमीवर AMCCIE च्या वतीने महाराष्ट्र शासनाकडे खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत :

- पुण्यात रेडी रेकनर दरांमध्ये प्रस्तावित 10 टक्के वाढ तात्काळ रद्द करण्यात यावी.
- सध्याचे रेडी रेकनर दर किमान पुढील पाच वर्षांसाठी स्थिर ठेवावेत.
- सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी शासनाने लोकाभिमुख निर्णय घ्यावेत.

तसेच रिअल इस्टेट क्षेत्रातील प्रमुख संस्था जसे की CREDAI, NAREDCO तसेच इतर बिल्डर्स व उद्योग संघटनांनीही या प्रस्तावित वाढीला एकत्रितपणे ठाम विरोध करावा आणि सर्वसामान्य घरखरेदीदारांच्या हितासाठी एकसंघ भूमिका घ्यावी, असे आवाहन AMCCIE कडून करण्यात आले आहे. याशिवाय सर्व पक्षांचे आमदार, मंत्रिमंडळातील मंत्री तसेच माननीय मुख्यमंत्री यांनी या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करून जनहिताचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

सरकारने उद्योग, रिअल इस्टेट क्षेत्र आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या हिताचा समतोल साधत जनहिताचा व विकासाभिमुख निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**– राजेश अग्रवाल राष्ट्रीय अध्यक्ष**
**अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) 96739 88770**

## 'मोगरा फुलला' उत्सव मॉरिशस येथे यशस्वीरीत्या संपन्न

**पुणे (दै. संध्या) :**

संतसाहित्यावरील 'मोगरा फुलला' हाभव्य सांस्कृतिक सोहळा समुद्राच्या कुशीत वसलेल्या मॉरिशस येथे १ मार्च २०२६ रोजी सर्ज कॉन्स्टंटीन थिएटर येथे उत्साहात संपन्न झाला. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या सुवर्णक्षणाच्या निमित्ताने हा विशेष उपक्रम स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आला होता.



या सोहळ्यामुळे जगभरातील मराठी रसिक एका सांस्कृतिक धाग्यात गुंफले गेले. गेल्या सुमारे २०० वर्षांपासून मॉरिशसमध्ये मराठी संस्कृती जपली जात असल्याने या कार्यक्रमासाठी मॉरिशसची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनने केले. यावेळी प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे आणि प्रसिद्ध गायिका सिन्मिता धापटे-शिंदे यांनी संतसाहित्यावर आधारित व्याख्यान आणि संगीतमय सादरीकरण सादर केले. तसेच शुभांगी शिंदे यांनी 'मी महाराष्ट्र बोलतोय' हे प्रभावी स्वागत सादर केले. मराठी भाषेशी जोडणाऱ्या विविध उपक्रमांचा समृद्ध अनुभव रसिक प्रेक्षकांना मिळाला. महाराष्ट्र आणि मॉरिशसमधील मराठी रसिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला मॉरिशसचे कला आणि संस्कृती मंत्री महेंद्र गोंदिया, मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्टचे अध्यक्ष धनीराव भवाजी, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे अध्यक्ष बलराज नारू, मॉरिशस मराठी स्पीकिंग युनियनचे अध्यक्ष भालचंद्र गोविंद, स्वान फाऊंडेशनचे सचिव विकास टाकळीकर आणि सचिव श्री. प्रसादराजे भोपळे उपस्थित होते.

यावेळी स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी हा उपक्रम विविध देशांमध्ये नेण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच एप्रिल महिन्यात लंडन येथे डॉ. बी. आर. आंबेडकर डिबेट वर्ल्ड कप आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. याशिवाय लवकरच मॉरिशसमध्ये आंतरराष्ट्रीय युथ फेस्टिव्हल आयोजित करण्याची घोषणाही त्यांनी केली.

'मोगरा फुलला' हा सोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम ठरला नाही, तर जागतिक पातळीवर मराठी अस्मिता, संत परंपरा आणि भाषिक अभिमान यांचे प्रभावी दर्शन घडवणारा ऐतिहासिक क्षण ठरला. परंपरा आणि आधुनिकतेचा संगम साधत मराठी संस्कृतीचे जागतिक बंध अधिक दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. मराठी संस्कृतीची सुवासिक परंपरा सीमारेषा ओलांडून जगभर फुलत राहो, अशी भावना या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आली.

## नव्या अर्थनीतीमुळेच देशाची अर्थव्यवस्था भक्कम : उद्योजक राम भोगले

**पुणे (दै. संध्या) :**

"अर्थनीती म्हणजे निव्वळ पैशांचं व्यवस्थापन नाही.तर ते देशाचे सर्वांगीण धोरण असते.म्हणूनच शिक्षण,संरक्षण,उद्योग,व्यापार व कृषी अशा सर्वच गोष्टींचा त्यात समावेश असतो.गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या सर्व क्षेत्रात अमुलाग्र बदल केले आणि अर्थनीतीला नवे आयाम जोडले. त्यामुळेच भारताची अर्थनीती 'थोडी आगळी , पण जगावेगळी' ठरली"असे प्रतिपादन प्रसिध्द उद्योजक राम भोगले यांनी रविवारी येथे बोलतांना केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची सहकारनगर येथील अरण्येश्वर प्रभात शाखा आणि विद्या विकास विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'शिक्षण महर्षी लक्ष्मीकांत जांभोरकर स्मृति व्याख्यानमाले'त ते बोलत होते.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पद्मावतीनगर संघचालक अविनाश धोमकर आणि विद्या विकास प्रशालेचे अध्यक्ष विंग कमांडर विनायक डावरे (निवृत्त) यावेळी व्यासपीठावर होते. 'भारताची अर्थनीती-थोडी आगळी,जगावेगळी' या विषयाच्या अनुषंगाने राम भोगले यांनी गेल्या दहा वर्षात भारताने केलेल्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली बदललेल्या अर्थनीतीमुळेच भारताला ही




झेप घेता आली असे ते म्हणाले. मोदी राजवटीपूर्वी आणि विशेषतः स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मागणी वाढवण्यावर सरकारचा भर होता.यामुळे मागणी वाढली,पण देशांतर्गत उत्पादन कमी असल्याने त्याचा फायदा चीन,अमेरिका या देशांनी घेतला.पंतप्रधान मोदीनी मात्र उत्पादवाढीवर भर दिला. 'उत्पादन वाढवा व आपल्या वस्तू परदेशात विका' हे त्यांचे सूत्र आहे. त्यांनी अनेक उद्योग खासगी क्षेत्रांसाठी खुले केले. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील उत्पादनेही भारत फोर्ज सारख्या कारखान्यात व्हायला लागली. मोबाईलच्या क्षेत्रात भारत जगात अग्रेसर ठरला. सरकारच्या गोदामात साठलेले धान्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब जनतेला मोफत दिले पण त्याचवेळी शेतकऱ्यांचे धान्य मोठ्या प्रमाणावर खरेदी करून शेतीविकासालाही वाव दिला. कर्ज धोरणात सुधारणा करुन बँका बळकट केल्या आणि 'मेक इन इंडिया' सारख्या योजना राबवून उद्योगांसाठी नवी क्षितीजे खुली केली. या नव्या अर्थनीतीमुळे करोनाच्या संकटानंतर जगातल्या अनेक राष्ट्रांची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली असतांना भारतीय अर्थव्यवस्था मात्र प्रगतीकडे झेप घेत आहे" असे राम भोगले म्हणाले. प्रारंभी डॉ शरद कुंटे यांनी प्रस्ताविकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी वर्षातील भूमिका मांडली.सुधीर मोघे यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. भूषण करमरकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी यजुर्वेद कंठस्थ घनपारायण पूर्ण केल्याबद्दल सहकारनगरमधील वेदमूर्ती ऋतूश मंगेश याळगी यांचा उद्योजक राम भोगले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणजे आर्थिक विषयाला अनुसरुन सुरुवातीला श्रीसुक्ताचे गायन करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ऊसतोड कामगारांसाठी सर्वसमावेशक कायदा आवश्यक : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील ऊसतोड कामगारांच्या आरोग्य, आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून त्यांच्या कल्याणार्थ सर्वसमावेशक कायदा तयार करणे आवश्यक असल्याचे मत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. तसेच कामगारांना आवश्यक साहित्य वेळेत उपलब्ध व्हावे यासाठी डीबीटी प्रणालीद्वारे तात्काळ मदत देण्याचे निर्देश त्यांनी दिले. ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना व देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, साखर आयुक्त संजय कोलते, डॉ. आशिष भारती उपसंचालक कुटुंब कल्याण, पुणे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तसेच गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे महाव्यवस्थापक भारत केंद्रे ऑनलाइन उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे सांगितले की, ऊसतोड कामगारांच्या विविध समस्यांचा सखोल विचार करून त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवण्यासाठी सर्वसमावेशक कायदा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. कामगारांना गमबूट, इलेक्ट्रिक कोयता, ग्लोव्हज, तसेच महिला कामगारांसाठी सॅनिटरी नॅपकिन यांसारख्या आवश्यक साहित्याची उपलब्धता वेळेत व्हावी यासाठी डीबीटीद्वारे आर्थिक मदत देणे अधिक सुलभ ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. ऊसतोड कामगारांसाठी उपलब्ध असलेल्या फिरत्या स्वच्छतागृहांची संख्या वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कामाच्या ठिकाणी आठवड्यातून एकदा फिरता दवाखाना उपलब्ध करून देण्याबरोबरच महिला कामगारांसाठी स्त्रीरोग तज्ञाची सेवा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.तसेच महिला ऊसतोड कामगारांना प्रसूती रजा व मातृत्व योजनांचा लाभ देण्याबाबत सकारात्मक विचार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी पाठपुरावा करावा असेही त्यांनी सांगितले.

## मायक्रोलॅरिंजियल शस्त्रक्रियेद्वारे व्होकल कॉर्ड पॉलिपचे यशस्वी उपचार

पुणे (दैनिक संध्या) : आवाजात बदल आणि दीर्घकाळ घोगरा आवाज (Hoarseness) या तक्रारीमुळे त्रस्त असलेल्या ३४ वर्षीय पुरुष रुग्णावर भोसरी येथील Medicover Hospitals येथे यशस्वीपणे अत्याधुनिक मायक्रोलॅरिंजियल शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाच्या आवाजाच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली असून रुग्णाला स्थिर प्रकृतीत घरी सोडण्यात आले. रुग्णाला काही काळापासून आवाजात बदल आणि घोगरा आवाजाची समस्या जाणवत होती. त्यामुळे दैनंदिन संवाद साधताना अडचणी येत होत्या. तपासणीदरम्यान श्वास घेण्यास त्रास किंवा इतर गंभीर लक्षणे आढळली नाहीत. पुढील लॅरिंजोस्कोपी तपासणीत डाव्या व्होकल कॉर्डच्या पुढील एक-तृतीयांश भागावर गाठ असल्याचे आढळले. ही गाठ व्होकल कॉर्ड पॉलिप असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. रुग्णाच्या सर्व आवश्यक तपासण्या पूर्ण करून आणि वैद्यकीयदृष्ट्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक फिटनेस मिळाल्यानंतर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. जनरल अॅनेस्थेशियाखाली डायरेक्ट लॅरिंजोस्कोपी करण्यात आली. या प्रक्रियेद्वारे घशातील लॅरिंक्सचे अचूक निरीक्षण करून डाव्या व्होकल कॉर्डच्या पुढील भागावरील पॉलिप ओळखण्यात आला. विशेष मायक्रोलॅरिंजियल उपकरणांच्या साहाय्याने ही गाठ अत्यंत काळजीपूर्वक काढण्यात आली. या प्रक्रियेदरम्यान व्होकल कॉर्डची नैसर्गिक रचना आणि आसपासची ऊतक संरक्षित ठेवण्यात आली. शस्त्रक्रिया कोणत्याही गुंतागुंतीशिवाय यशस्वीपणे पूर्ण झाली.

## धारावीतील 436 झोपडपट्टीधारकांचे देवनार येथे पुनर्वसन

मुंबई (दैनिक संध्या) : धारावी येथे १९९९ साली लागलेल्या भीषण आगीत बाधित झालेल्या 'राजीव गांधी एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थे'तील ४३६ पात्र झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी देवनार येथील सर्व्हे क्रमांक ९३ मधील सुमारे ११ हजार ६५९ चौरस मीटर शासकीय जमीन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला (एसआरए) देण्यास गुरुवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याने धारावीतील आगग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसन प्रक्रियेला गती मिळणार आहे. धारावी परिसरात १९९९ साली लागलेल्या आगीत अनेक झोपड्या जळून खाक झाल्या होत्या. या घटनेत बाधित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसनासाठी 'राजीव गांधी एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था' स्थापन करण्यात आली होती. मात्र पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन उपलब्ध नसल्याने हा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिला होता. आता देवनार येथील सर्व्हे क्रमांक ९३ मधील शासकीय जमीन एसआरएकडे वर्ग करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्यामुळे या ४३६ पात्र झोपडपट्टीधारकांच्या घरांच्या पुनर्वसन प्रकल्पाला गती मिळणार आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आगग्रस्त कुटुंबांना सुरक्षित आणि कायमस्वरूपी निवारा उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेला आता वेग मिळणार असून धारावी परिसरातील पुनर्वसनाच्या प्रयत्नांना महत्त्वपूर्ण चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

# हंगामा ओटीटी सादर करत आहे महिला-केंद्रित थरारक क्राईम सिरीज

**■ हंगामा ओटीटीच्या बेगम ऑफ क्राईम मध्ये सना मकबूल दिसणार एका धाडसी आणि कधीही न पाहिलेल्या नव्या अवतारात ■**

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतातील प्रमुख डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपली नवीन ओरिजिनल सिरीज, बेगम ऑफ क्राइम, मार्च 2026 रोजी लाँच केली. ही सिरीज महत्वाकांक्षा, जगण्यासाठीची लढाई आणि सामर्थ्य मिळवण्याच्या किंमतीची थरारक कथा सादर करते, ज्यामुळे क्राईम थ्रिलर अधिक रोमांचक बनते. बेगम ऑफ क्राइम मध्ये महत्वाकांक्षा, सन्मान मिळवण्याची तीव्र इच्छा आणि स्त्री सशक्तीकरण व नाश यांचा संघर्ष दाखवला




आहे. ही कथा दिव्या बद्दल आहे, जिची भूमिका सना मकबूलने साकारली आहे, आणि जी पारंपरिक नायिकेच्या कल्पनेला मोडते. धाडसी आणि ठाम असलेली दिव्या, स्वतःच्या जीवनासाठी घराचा सुरक्षित आधार सोडते आणि स्वतःच्या अटींवर आपले जीवन उभारण्याचा निर्धार करते. ज्या जगाने तिला कमी लेखले, त्या जगातही ती स्वतःला लहान पडू देत नाही. प्रत्येक अडथळा दिव्याचा निर्धार अधिक मजबूत करतो. प्रत्येक समर्पण तिला नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत घेऊन जाते. सुरुवातीला ही गोष्ट फक्त जगण्यासाठीची लढाई होती, पण हळूहळू ती खूप धोकादायक बनते. फसवणूक सामान्य होते, छळ आणि मानसिक खेळ तिचे संरक्षण बनतात. चोरी आणि विश्वासघात पायऱ्या ठरतात, आणि शेवटी रक्त ओघळते. कमी समजल्या जाणाऱ्या स्वप्नाळू दिव्याचा बदल, विचारपूर्वक ताकदवान व्यक्ती बनणे, ही या थरारक कथेला मुख्य आधार देते. दिव्याची भूमिका साकारण्याबद्दल तिचे विचार मांडताना सना मकबूल म्हणाली, "माझ्या ओटीटी पदार्पणासाठी मी योग्य प्रोजेक्टची वाट पाहत होते, आणि बेगम ऑफ क्राईम माझ्यासाठी परिपूर्ण ठरली. दिव्या धाडसी, निःसंकोच आणि अत्यंत ठाम आहे. ती राखाडी नैतिकतेत काम करते; तिच्या प्रत्येक निर्णयाशी सगळे सहमत नसतील असे नाही. एक अभिनेत्री म्हणून तिच्या विचारात पाऊल ठेवणे भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक होते, कारण ती विश्वास ठेवते की जर जग तिला सन्मान देत नसेल, तर ती तो सन्मान कोणत्याही मार्गाने मिळवेल. हाच भावनिक उत्साह तिला शक्तिशाली आणि अनपेक्षित बनवते." करण शर्मा म्हणाला, "गुड्डूकडे मला आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे त्याच्या प्रवासात होणारा भावनिक बदल. जेव्हा तो दिव्याला पहिल्यांदा भेटतो, तेव्हा त्याला तो तिच्या धाडसीपणा आणि तीक्ष्ण बुद्धीमत्तेने प्रभावित होतो. पण जेव्हा ते एकत्र गुन्हे करण्यास सुरुवात करतात, तेव्हा त्याला हळूहळू कळते की तिची महत्वाकांक्षा त्याच्या कल्पनेपेक्षा खूप खोल आणि गडद आहे. ते परिवर्तन घडताना पाहणे आणि त्याचा भाग असणे हे एकाचवेळी रोमांचक आणि अस्वस्थ करणारे होते." बेगम ऑफ क्राईम सखोल कथाकथन, तल्लख पात्रं आणि पारंपरिक चौकटीत बसण्यास नकार देणाऱ्या नायकासह क्राईम थ्रिलरच्या मर्यादांना पुढे नेते. ही सिरीज आता हंगामा ओटीटी, टाटा प्ले बिंज, वॉचो, बीएसएनएल, प्लेबॉक्सटीव्ही, रेलवायर ब्रॉडबँड, एअरटेल एक्सस्ट्रीम प्ले आणि डोर टीव्ही यासारख्या प्लॅटफॉर्मवर पाहता येईल.

## सिंगापूरमध्ये 'डिस्नी अॅडव्हेंचर'चे भव्य आगमन

**पुणे (दै. संध्या) :**

**■ १० मार्चपासून पहिला प्रवास**

डिस्नी क्रूझ लाइनच्या नवीन होमपोर्ट असलेल्या सिंगापूरमध्ये 'डिस्नी अॅडव्हेंचर' या बहुप्रतीक्षित क्रूझ जहाजाचे भव्य आगमन झाले आहे. मरीना बे क्रूझ सेंटर सिंगापूर येथे जहाज पोहोचताच पाण्याचे फवारे उडवून (वॉटर सॅल्युट) त्याचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. हे आलिशान जहाज १० मार्च २०२६ रोजी सिंगापूरहून आपल्या पहिल्या प्रवासाला सुरुवात करणार आहे. या जहाजावर कुटुंबांसह सर्व वयोगटातील पर्यटकांसाठी ३ आणि ४ रात्रींच्या समुद्री सहलींचे आयोजन करण्यात येणार आहे. डिस्नी, पिक्सार आणि मार्व्हलच्या १०० वर्षांहून अधिक कालावधीतील लोकप्रिय कथांवर आधारित जागतिक दर्जाचे मनोरंजन, स्वादिष्ट भोजन आणि आकर्षक निवासव्यवस्था पर्यटकांना अनुभवता येणार आहे.

डिस्नी सिग्नेचर एक्सपीरियन्सेसचे अध्यक्ष जो शॉट म्हणाले, "सिंगापूरमध्ये 'डिस्नी अॅडव्हेंचर'चे आगमन हे आमच्या जागतिक विस्तारातील महत्त्वाचे पाऊल आहे. आशियामध्ये पहिल्यांदाच डिस्नी क्रूझिंगची ओळख करून देताना आम्हाला आनंद होत आहे. आमचे हे नवीन जहाज सर्जनशीलता आणि कथाकथनाची खास शैली नव्या गंतव्यस्थानांपर्यंत घेऊन जाणार आहे." डिस्नी क्रूझ लाइनने २०३१ पर्यंत १३ जहाजांचा ताफा उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापूर्वी डिस्नी ट्रेझर आणि डिस्नी डेस्टिनी या जहाजांच्या पदार्पणानंतर कंपनी या विस्ताराकडे वेगाने वाटचाल करत आहे. १६० हून अधिक शहरांशी थेट विमानसेवा आणि मरीना बे क्रूझ सेंटरसारख्या आधुनिक सुविधांमुळे सिंगापूर आशिया-पॅसिफिकमधील महत्त्वाचे क्रूझ केंद्र म्हणून उदयास आले आहे. २०२५ मध्ये सिंगापूरमध्ये ३७५ जहाजांच्या आगमनातून २० लाखांहून अधिक प्रवाशांची नोंद झाली होती. 'डिस्नी अॅडव्हेंचर'च्या पाच वर्षांच्या होमपोर्टिंग करारामुळे पर्यटन आणि सागरी क्षेत्रात मोठी आर्थिक उलाढाल होण्याची अपेक्षा आहे. या जहाजावर पर्यटकांना आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थांसह आशियातील प्रसिद्ध पदार्थ, बबल टीसारखी पेये यांचा आस्वाद घेता येणार आहे.

## राजपुताना स्टेनलेस लिमिटेडचा मेगा आयपीओ ९ मार्चपासून खुला

**मुंबई (दै. संध्या) :**

स्टेनलेस स्टील उत्पादन क्षेत्रात तीन दशकांहून अधिक अनुभव असलेल्या राजपुताना स्टेनलेस लिमिटेड या कंपनीने सुमारे २५४.९८ कोटी रुपयांचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ) जाहीर केला आहे. हा आयपीओ ९ मार्च २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होणार असून ११ मार्च २०२६ रोजी बंद होईल. कंपनीने प्रति शेअर ११६ ते १२२ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे. गुंतवणूकदारांना किमान ११० शेअर्स आणि त्याच्या पटीत अर्ज करता येणार असून किरकोळ गुंतवणूकदारांसाठी किमान गुंतवणूक १३,४२० रुपये असेल. शेअर्सचे वाटप १२ मार्च रोजी होण्याची अपेक्षा असून १६ मार्च २०२६ रोजी हे शेअर्स बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध होण्याची शक्यता आहे. या आयपीओसाठी निर्भय कॅपिटल सर्व्हिसेस प्रा. लि. हे बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून काम पाहणार असून केफिन टेक्नॉलॉजी लिमिटेड रजिस्ट्रार आहे.

**निधीचा वापर विस्तारासाठी**

२५५ कोटी रुपयांच्या



एकूण इश्यूपैकी १७८.७३ कोटी रुपये फ्रेश इश्यूद्वारे उभारले जाणार आहेत, तर ७६.२५ कोटी रुपये ऑफर फॉर सेल (ओएफएस) अंतर्गत प्रमोटर्सकडून विकले जाणार आहेत.

उभारलेल्या निधीचा वापर कंपनी पुढील उद्दिष्टांसाठी करणार आहे:

- नवीन उत्पादन युनिट : स्टेनलेस स्टील सीमलेस पाईप्ससाठी नवीन प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे १८.५७ कोटी रुपये गुंतवणूक.
- कर्ज परतफेड : कंपनीच्या ९८ कोटी रुपयांपर्यंतच्या सुरक्षित कर्जाची अंशतः किंवा पूर्णपणे परतफेड.

**कंपनीचा व्यवसाय आणि उत्पादन क्षमता**

१९९१ मध्ये स्थापन झालेली राजपुताना स्टेनलेस लिमिटेड ही



स्टेनलेस स्टीलच्या लांब आणि सपाट उत्पादनांमध्ये आघाडीची कंपनी आहे. गुजरातमधील कलोल येथे सुमारे ३५,१९६ चौरस मीटर परिसरात तिचे आधुनिक उत्पादन युनिट असून इंडक्शन फर्नेस, एओडी, सीसीएम आणि रोलिंग मिल यांसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. कंपनीच्या उत्पादनांमध्ये बिलेट्स, फोर्जिंग इनगॉट्स, रोल्ड ब्लॉक बार, रोल्ड ब्राइट बार, फ्लॅट्स, कॉइल्स यांसह विविध उत्पादने समाविष्ट आहेत. ही उत्पादने ८० हून अधिक स्टेनलेस स्टील ग्रेडमध्ये उपलब्ध असून सीमलेस पाईप्स, फोर्जिंग, अभियांत्रिकी, कास्टिंग, फास्टनर्स, पंप, शाफ्ट आणि ऑटोमोटिव्ह उद्योगांमध्ये वापरली जातात.

**जागतिक बाजारपेठेत उपस्थिती**

भारतीय बाजारपेठेबरोबरच कंपनी अमेरिका, यूएई, तुर्की, कुवेत आणि पोलंड यांसारख्या देशांमध्येही निर्यात करते. एरोस्पेस, संरक्षण, ऑटोमोटिव्ह, विमानचालन आणि तेल-वायू उद्योगांमध्ये तिच्या उत्पादनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. सप्टेंबर २०२५ पर्यंत कंपनीकडे ४०० हून अधिक कुशल कर्मचारी कार्यरत आहेत.

**मजबूत आर्थिक कामगिरी**

कंपनीने गेल्या काही वर्षांत सातत्याने चांगली आर्थिक कामगिरी केली आहे.

- एकूण महसूल : आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ९३७.४९ कोटी रुपये
- निव्वळ नफा (PAT) : मार्च २०२५ अखेर ३९.८५ कोटी रुपये, तर सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या सहा महिन्यांत २४.४१ कोटी रुपये

**निव्वळ संपत्ती : सप्टेंबर २०२५ पर्यंत १७६.६५ कोटी रुपये**

या आयपीओद्वारे मिळणाऱ्या निधीच्या जोरावर कंपनी उत्पादन क्षमता वाढवून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपली उपस्थिती अधिक मजबूत करण्याच्या तयारीत आहे.

## अॅमेझॉन एमएक्स प्लेयरद्वारे 'संकल्प'चा ट्रेलर प्रसिद्ध; सामाजिक-राजकीय थ्रिलरमध्ये नाना पाटेकर झळकणार

**मुंबई (दै. संध्या) :**

**■ जिओ स्टुडिओचे सादरीकरण आणि ए पीजेपी फिल्म्स निर्मित, संकल्प अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर दिनांक 11 मार्चपासून मोफत स्ट्रीम होणार**




भारताची अग्रगण्य मोफत, दर्जेदार, अॅड-सपोर्टेड व्हीडिओ स्ट्रिमिंग सेवा असणाऱ्या अॅमेझॉन एमएक्स प्लेयरने आज आपल्या आगामी सामाजिक-राजकीय थ्रिलर संकल्प'चा दमदार ट्रेलर लॉन्च केला. या निमित्ताने सुप्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांचे बहुप्रतिक्षित स्ट्रिमिंग पदार्पण झाले. प्राचीन चाणक्य-चंद्रगुप्ताच्या इतिहासापासून प्रेरित, ही मालिका आधुनिक भारताच्या राजकीय धोरणाची नव्याने कल्पना करते. जिथे फक्त काळ बदल दिसून येईल. या ट्रेलरमध्ये संस्कार, सत्ता आणि समर्पण या तीन शक्तींनी आकार घेतलेल्या जगात लक्षवेधी प्रवेश दाखवण्यात आला आहे. नाना पाटेकर यांची मुख्य भूमिका असलेल्या सिरीजमध्ये संजय कपूर, मोहम्मद झीशान अयूब, नीरज काबी, कुब्रा सैत, क्रांती प्रकाश झा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. जिओ स्टुडिओजसाठी ज्योती देशपांडे आणि पीजेपी फिल्म्स प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली दिशा झा निर्मित 'संकल्प' या कलाकृतीचा प्रीमियर 11 मार्च रोजी खास अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर होणार आहे.

जिओ स्टुडिओचे सादरीकरण असलेली ही तडफदार मालिका राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते प्रकाश झा दिग्दर्शित आणि निर्मित आहे. राजकीय सत्ताकेंद्रांवर आधारित, ही कथा मात साब या प्रभावशाली शिक्षकाची ओळख करून देते. ज्याचे अधिकार मूल्ये, निष्ठा आणि अतूट भक्तीवर अवलंबून असतात. महत्त्वाकांक्षेची नैतिक किंमत आणि मार्गदर्शन तसेच वर्चस्व प्रस्थापित करणे यांच्यातील धूसर रेषा उघड करून, मार्गदर्शक आणि शिष्य यांच्यातील आवेशपूर्ण संघर्षासह ट्रेलर स्थिरपणे तयार होतो. त्यातून निर्माण होणारा संघर्षच, विद्यार्थी हा गुरूच्या विरोधात उठतो की नाही हे दर्शविण्याकरिता प्रेक्षकांच्या उत्कंठा वाढवतो. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर म्हणाले, "मात साबची भूमिका साकारणे हे माझ्यासाठी खूप मोठे शिक्षण घेण्यासारखे आहे. यामुळे मला एक नवीन आयाम शोधण्याची प्रेरणा मिळाली. शांतता, संघर्ष आणि परिणामांनी भरलेले हे पात्र आहे. प्रकाश झा यांच्यासोबत पुन्हा काम करणे नेहमीच खास असते, कारण ते अशा कथा घेऊन येतात ज्या सर्वकाही स्पष्ट करत नाहीत. पण त्या जगाचं प्रतिनिधित्वत करतात आणि ते तुमच्याबरोबर राहतात. अखेरीस, हा प्रोजेक्ट माझ्यासाठी अधिक खास ठरतो कारण मी अॅमेझॉन एमएक्स प्लेयरद्वारे ओटीटी जगात पदार्पण करत आहे. प्रेक्षकांना संकल्पाचे जग अनुभवण्याची प्रतीक्षा करू शकत नाही." या सिरीजबद्दल बोलताना, अॅमेझॉन एमएक्स प्लेयरचे डायरेक्टर आणि कंटेंट हेड अमोघ दुसाद म्हणाले, "संकल्प हा एक तीक्ष्ण, समकालीन सामाजिक-राजकीय थ्रिलर आहे. यामधील व्यक्तिरेखा 'लार्जर दॅन लाईफ' आहेत; ज्या शक्ती, विश्वास आणि प्रेरणा यांचा शोध घेतात. ही मालिका अर्थपूर्ण संभाषणांना चालना देणाऱ्या सांस्कृतिकदृष्ट्या मूळ असलेल्या कथांवर आपले लक्ष केंद्रित करते. प्रकाश झा यांनी अनेक प्रभावी कथांची निर्मिती केली आहे. त्यांच्यासोबतचे आमचे दीर्घकालीन सर्जनशील सहकार्यही यात कायम आहे. नाना पाटेकर अॅमेझॉन एमएक्स प्लेअरसह स्ट्रीमिंगमध्ये पदार्पण करत असल्याने त्यांच्यासोबत काम करताना आम्हाला आनंद होत आहे."

दिग्दर्शक आणि निर्माते प्रकाश झा म्हणाले, "कथाकथन हा जबाबदारीचा भाग आहे यावर माझा कायमच विश्वास आहे. त्या विश्वासावर संकल्प बांधला जातो. शक्ती, हेतू आणि परिणामांची तपासणी अशा प्रकारे केली जाते जी प्रेक्षकांसोबत राहते. अॅमेझॉन एमएक्स प्लेयर आणि जिओ स्टुडिओज यांच्या सहकार्याने हा दृष्टिकोन दूरदूरच्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकला आहे. ज्यामुळे महत्त्वाच्या कथेचा प्रभाव वाढला. जेव्हा एखादी कथा आपल्या जगाच्या समजुतीला आव्हान देणारे प्रश्न मागे सोडते तेव्हा ती खरोखरच यशस्वी होते."

संकल्प 11 मार्चपासून अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर मोफत स्ट्रीम होईल. जे मोबाईलवरील अॅप्स, अॅमेझॉनचे शॉपिंग अॅप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि कनेक्टेड टीव्हीद्वारे उपलब्ध असेल.

# झी टीव्ही कलाकार सांगत आहेत त्यांच्या खास होळी परंपरा!

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

रंगांचा सण जवळ येताच वातावरणात एक हलकीशी जादू पसरते. हा काळ केवळ चमकदार रंगांचा नसून, मनाला नवीन ऊर्जा देणारा आणि शांत चिंतन घडवणारा असतो. होळी म्हणजे प्रत्येक रंगाच्या आनंदी उधळणीतून ऊब, प्रकाश आणि सकारात्मकतेला मिठी मारण्याचा उत्सव. झी टीव्हीचे अभिषेक शर्मा, सयंतानी घोष, जयती भाटिया आणि शगुन पांडे यांच्यासाठी होळी हा केवळ गुलाल उधळण्याचा किंवा सणाच्या गजबजाटात रमण्याचा दिवस नाही, तर त्यांच्या मनात कायम जपल्या



गेलेल्या आठवणी, नात्यांचे घट्ट बंध आणि वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरांनी विणलेला एक सुंदर अनुभव आहे. रंग फिके झाले तरी या आठवणी त्यांच्या मनात ताज्याच आहेत. प्रत्येक कलाकाराकडे बालपणातील उत्सुकता, कुटुंबातील सणांच्या रीती, मनाला समृद्ध करणारे अनुभव आणि आपल्या जवळच्या लोकांसोबत घालवलेले अविस्मरणीय क्षण अशा त्यांच्या वेगळ्या कथा आहेत. त्यांच्या या अनुभवांतून ते 2026 मधील होळीचा अर्थ सांगतात आणि तो म्हणजे आनंद, प्रेम, माफी आणि नवीन सुरुवातींचे सुंदर वचन देणारा एक जीवंत उत्सव!

झी टीव्हीच्या 'वसुधा' मालिकेत देवची भूमिका साकारणारा अभिषेक शर्मा म्हणाला, "शाळेतून रंगांनी माखून घरी येणे, मित्रांसोबत पाण्याचे फुगे भरणे आणि घरी बनवलेल्या गरमागरम गुजिया खाणे अशा होळीच्या खूप गोड आठवणी माझ्या मनात मी जपल्या आहेत. आता आपण मोठे झालो आहोत म्हणून ती मजा थोडी बदलली आहे, पण कुटुंबासोबत होळी साजरी करण्याचा आनंद तितकाच कायम आहे. मी दिवसाची सुरुवात आई-बाबांच्या आशीर्वादाने करतो, घरच्यांसोबत रंग खेळतो आणि सगळ्यांसोबत सणाचे जेवण जेवतो. सर्वांना होळीच्या हार्दिक शुभेच्छा. हा सण प्रेमाने आणि एकत्रपणे साजरा करा."

झी टीव्हीच्या 'सरू' मालिकेत वेदची भूमिका करणारा शगुन पांडे म्हणाला, "होळी हा एक असा सण आहे जिथे जीवन कितीही धावपळीचे असले तरी वेळ जरा थबकते. लहानपणी माझे चुलत भाऊ-बहिणी आणि मी गल्ली-गल्लीत फिरायचो, गुलाल घेऊन एकमेकांच्या मागे धावत हसत-खेळत असायचो. त्या क्षणांनी मला शिकवले की जीवन उत्साहाने, जोशाने आणि थोड्या खोडकरपणाने जगायचे असते. आज मी सेटवर काम करत असो किंवा घरी कुटुंबासोबत असो, तोच उत्साह, तेच हसू, तीच धम्माल, संगीत आणि एक दिवस का होईना, सगळ्या चिंता विसरण्याचा आनंद मनात ठेवण्याचा प्रयत्न करतो. होळी आपल्याला सांगते की प्रत्येक रंगाचा, प्रत्येक क्षणाचा आपल्या आयुष्याच्या कथेत एक वेगळा अर्थ असतो. तर चला, आपले दिवस प्रेमाने, दयाळूपणे आणि रंगीबेरंगी आनंदाने सजवूया."

झी टीव्हीच्या 'जगद्धात्री' मालिकेत मायाची भूमिका करणारी सयंतानी घोष म्हणाली, "माझ्या बालपणातील होळीच्या खूप सुंदर आठवणी आहेत. शाळेमध्ये असताना आम्ही दिवसभर रंग खेळायचो आणि होळी संपल्यानंतरही चेहऱ्यावर रंग किती वेळ दिसतो याची स्पर्धा करायचो. इतका रंग खेळायचो की ओळखूही येऊ नये! पूर्वी हर्बल रंग, साईड-इफेक्ट्स याची चिंता नसायची.



## जेजुरी नगरपरिषद, जेजुरी जि. पुणे

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र.जेनपा/कावि/४३२/२०२६
दिनांक : ०५/०३/२०२६.

जेजुरी नगरपरिषद महिला व बालकल्याण समिती अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त जेजुरी शहरातील महिलांसाठी व युवतींसाठी आरोग्य शिबीर राबविण्यात येणार आहे सदर वेळी अल्पोपहार व चहा पुरविणारे पुरवठादार यांचेकडून खालीलप्रमाणे सिलबंद दरपत्रक मागविण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | प्रती नग दर देणे |
| --- | --- | --- |
| १ | जागतिक महिला दिनानिमित्त अल्पोपहार व चहा पुरविणेबाबत | |

वरील कामांच्या दरपत्रक दिनांक : १२/०३/२०२३ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत दु. २.०० वा पर्यंत स्विकारण्यात येतील, कामांसंबंधी अधिक माहिती जेजुरी नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. अटिंच्या व शर्तीच्या दरपत्रक स्विकारल्या जाणार नाहीत. दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

शिक्का

सही/-
(चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी,
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

# पिंपरी-चिंचवड आणि परिसर

## थोडक्यात पण महत्वाचे...




### शहर अभियंता पदाच्या विविध विभागांच्या कार्यभाराचे तात्पुरता स्वरुपात वाटप

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम हे महापालिका सेवेतून २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे शहर अभियंता निकम यांच्या कडील विविध विभागांचा कार्यभार तात्पुरता स्वरूपात महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता मनोज सेठिया आणि सुनील भागवानी यांच्याकडे सोपवण्यात आला आहे, याबाबतचे आदेश आज निर्गमित केलेले आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या आदेशानुसार मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या पाणी पुरवठा व प्रकल्प विभागासह स्थापत्य विभागाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सह शहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या स्थापत्य मुख्य कार्यालय विभागासह उद्यान व क्रीडा स्थापत्य, शहरी दळणवळण या विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. तसेच सह शहर अभियंता सुनील भागवानी यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या विभागासह बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.

### नवी सांगवीत गुंतवणुकीच्या नावाखाली 11 लाखांची फसवणूक




पिंपरी (दैनिक संध्या) : नवी सांगवी परिसरात शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली ११ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ८ एप्रिल २०२३ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत गणेश पॅलेस, समर्थ नगर, नवी सांगवी येथे घडली. फिर्यादी प्रतीक संजय तोडमल (वय २९, रा. गणेश पॅलेस, नवी सांगवी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी प्रवीण विठ्ठल काटकर (वय ३३, रा. गणेश पॅलेस, समर्थ नगर, नवी सांगवी) याने शेअर मार्केटमधील पी.के. प्रॉफिट ट्रेडिंग कंपनीत गुंतवणूक केल्यास दरमहा १० ते २० टक्के नफा मिळेल व एका वर्षानंतर मूळ रक्कम परत केली जाईल, असे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून फिर्यादी यांनी आरोपीकडे २ लाख ५० हजार रुपये गुंतवले. तसेच दीपक लोंढे यांच्याकडून ५ लाख रुपये आणि अक्षय सुतार यांच्याकडून ३ लाख रुपये अशी एकूण ११ लाख रुपयांची रक्कम गुंतवण्यात आली. मात्र, आश्वासनाप्रमाणे नफा अथवा मूळ रक्कम परत न करता आरोपीने आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

### पिंपरी-चिंचवडमध्ये 7 व 8 मार्चला 'अटल महाआरोग्य शिबिर' – आमदार शंकर जगताप

- लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त आयोजन
- सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावर सलग ११ व्या वर्षी 'आरोग्य यज्ञ'

पिंपरी (दैनिक संध्या) : लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड येथे ११ व्या 'अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. ७ आणि ८ मार्च २०२६ रोजी नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर हे शिबिर होणार असून, महाराष्ट्रातील नामवंत रुग्णालये आणि तज्ज्ञ डॉक्टर सहभागी होणार आहेत. अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. आमदार शंकर जगताप यांनी याबाबत माहिती दिली. या शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता होईल. सायंकाळी ५ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत. 'लक्ष्मणभाऊंचा वारसा रुग्णसेवेचा, संकल्प जनतेच्या निरोगी आयुष्याचा' हे ब्रीद समोर ठेवून शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरात साध्या तपासणीपासून ते जटिल शस्त्रक्रियांपर्यंतच्या मार्गदर्शनाबाबत सुविधा उपलब्ध आहेत. हृदयरोगांसाठी एन्जोप्लास्टी, हृदयाच्या झडपांची शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांच्या हृदयातील छिद्रावर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. कॅन्सर तपासणी, केमोथेरपी व रेडिएशनबाबत मार्गदर्शन दिले जाईल. गुडघे व खुबा प्रत्यारोपण, मोतीबिंदू, प्लास्टिक सर्जरी आणि मणक्याचे आजार यांवरील शस्त्रक्रियाही केल्या जाणार आहेत. एमआरआय, सिटी स्कॅन, मॅमोग्राफी, सोनोग्राफी व डायलिसिस यांसारख्या तपासण्या उपलब्ध राहतील. तसेच फिजिओथेरपी, आयुर्वेदिक उपचार, पंचकर्म, होमिओपॅथी आणि मोफत औषध वाटपाची सुविधा देण्यात येणार आहे.

### दुबईत अडकलेले पिंपरी-चिंचवडचे 84 विद्यार्थी सुखरूप परत

पिंपरी (दैनिक संध्या) : इस्रायल, अमेरिका व इराण यांच्यात संघर्ष पेटल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील ताथवडे येथील इंदिरा विद्यापीठाचे 84 विद्यार्थी दुबई येथे अडकले होते. अखेर विशेष विमानाच्या माध्यमातून हे सर्व विद्यार्थी सुखरूप शहरात परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे. इस्रायल, अमेरिका व इराण देशात 28 फेबुवारीपासून युद्ध पेटले आहे. युद्धामुळे भारतातून दुबईला जाणारी तसेच तेथून येणारी विमानसेवा बंद करण्यात आली आहे; मात्र, शिक्षणासाठी दुबईला गेलेली आपली मुले कशी येणार, या विचाराने पालक घाबरले होते. यामध्ये दहा शिक्षकांचाही समावेश होता. त्यामुळे सर्वांचे कुटुंबीय मोठ्या तणावात होते. युद्धाची परिस्थिती आणि क्षेपणास्त्रांचा होणारा मारा या बातम्या ऐकून विद्यार्थ्यांच्या पालकांची काळजी वाढत होती. यावेळी इंदिरा विद्यापीठाच्या अध्यक्षा डॉ. तरिता शंकर यांच्याकडून फोन, पत्रव्यवहार, मुख्यमंत्री, पंतप्रधान, परराष्ट्र मंत्रालय, गृहमंत्रालय अशा सर्व स्तरांवर पाठपुरावा सुरू होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर बातमी पडताच त्यांच्या कार्यालयातून तत्काळ संपर्क साधण्यात आला. दुबईतील महाराष्ट्र मंडळाचे सोमनाथ पाटील विद्यार्थ्यांच्या हॉटेलवर पोहोचले. व्हिडीओ कॉलवर उपमुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत मी तुम्हाला सुरक्षित परत आणतो, अशी खात्री दिली. त्या एका वाक्याने विद्यार्थ्यांना धीर मिळाला.

## शहर प्रदूषणमुक्तीवर भर देणार : बारणे

### मनपाच्या पहिल्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासोबतच शहराच्या शाश्वत विकासासाठी 'इन्कम जनरेशन' आणि 'प्रदूषण नियंत्रण' या दोन सूत्रांवर भर दिला जाणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर,नगरसचिव मुकेश कोळप , अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते. स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. स्थायी समिती सभापती दालनात प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर भूमिका मांडताना ते बोलत होते. बैठकीत मनपाच्या मुख्य लेखा विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जाला मंजुरी देण्यात आली. तसेच, महापालिकेच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिना"निमित्त दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमासाठी यामध्ये कलाकार, वक्ते मानधन, सांस्कृतिक कार्यक्रम असा एकूण खर्च र. रु. ७,५०,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. शहरात सुरू असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी कडक पावले उचलली आहेत. "शहरात धुळीचे प्रमाण वाढू नये आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी बांधकाम सुरक्षा (Safety) तपासण्यासाठी दोन विशेष पथके तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या हद्दीतील मोठ्या कामांची प्रगती आणि सुरक्षिततेची नियमित देखरेख करावी," असे निर्देश सभापती बारणे यांनी बैठकीत दिले. महापालिकेच्या आर्थिक नियोजनाबाबत बोलताना अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले की, सध्या पालिकेवर दायित्व अधिक आहे. "नवीन कामांपेक्षा आधीचे प्रकल्प पूर्ण करणे आणि पालिकेचे उत्पन्न वाढवणे हे आमचे प्राधान्य आहे. वाकडसह उपनगरांतील कर संकलन वाढवणे आणि होर्डिंग्जच्या माध्यमातून महसुलात भर टाकणे यावर आम्ही भर देत आहोत. निधी वाढल्यास शहराच्या वैभवात भर घालणारी कामे वेगाने होतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, महापालिकेवर असलेले कर्ज कमी करून शहर कर्जमुक्त करण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. महापालिकेच्या ठेवींबाबत भाष्य करताना अभिषेक बारणे यांनी सांगितले की, "महापालिकेच्या आवश्यक ठेवींमध्ये कोणतीही घट झालेली नाही. त्या पूर्णपणे सुरक्षित आहेत. तरीही, या आरोपांची सविस्तर माहिती घेऊन योग्य ती चौकशी केली जाईल." अत्यावश्यक नसलेली नवीन कामे तूर्तास थांबवून केवळ गरजेच्या कामांनाच प्राधान्य दिले जाणार आहे. आजच्या सभेत प्रलंबित राहिलेल्या विषयांवर आणि विविध उपसूचनांवर पुढील सभेत सविस्तर चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

#### खर्चात कपात आणि पारदर्शक कारभार

पदाधिकाऱ्यांच्या वाहन भाड्याबाबत होणाऱ्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, "चालकांची कमतरता असल्याने भाडेतत्त्वावर गाड्या घेण्याचे जुने धोरण आहे. मात्र, सव्वा लाख रुपये महिना यांसारख्या मोठ्या बिलांची आणि दरांची आम्ही पुन्हा शहानिशा करणार आहोत. इंधन, चालक आणि देखभाल यासह वाजवी दरात सेवा मिळावी, यासाठी खर्चात कपात करण्याचे आमचे धोरण आहे." त्यानुसार पदाधिकारी स्वेच्छेनुसार त्यांना दरमहा ५० हजार रुपये खर्च देण्याबाबत विचार विनिमय सुरु आहे. तसेच, प्रत्येक विभागाच्या कामाचा आढावा घेऊनच बिले अदा केली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दुबई येथून १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले

### उर्वरित नागरिकांना आणण्याची कार्यवाही सुरु : जिल्हाधिकारी

**पुणे (दै. संध्या) :**



मध्यपूर्व व आसपासच्या काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुबई येथे अडकलेल्या जिल्ह्यातील एकूण १८४ नागरिकांपैकी १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले आहेत. तसेच १९ नागरिकांच्या विमान उड्डाणाची वेळ बदलण्यात आली असून ५४ नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरु आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांनी आवश्यक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा. पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवेत, बहारीन, मस्कत, जॉर्डन तसेच संयुक्त अरब अमिरात (अबूधाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, अनावश्यक हालचाली टाळाव्यात व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शासनाच्या वतीने वेळोवेळी करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४x७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले असून, दूतावासांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. परदेशात वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा, अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासांशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे.

## नगरसेवकांसाठी राष्ट्रवादीकडून ३ नावे

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी नगरसेविका सीमा सावळे तसेच, पक्षाचे कार्याध्यक्ष फजल शेख या तीन जणांची नावे आयुक्तांना सादर केली आहेत. तर, नावांवरून एकमत न झाल्याने सत्ताधारी भाजपाकडून मुदत वाढवून देण्याची विनंती आयुक्तांकडे करण्यात आली आहे. त्यावरून भाजपामधील अंतर्गत घोळ आणि वाद पुन्हा चव्हाटावर आला आहे. महापालिकेतील नगरसेवक संख्याबळानुसार सत्ताधारी भाजपाचे 7 आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे 3 स्वीकृत नगरसेवक होणार आहेत. त्यानुसार 13 मार्चच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर स्वीकृत नगरसेवकांची नियुक्तीचा विषय आहे. स्वीकृत नगरसेवकांसाठी नावाची शिफारस दुपारी 3 ते सायंकाळी 6 या वेळेत करण्याच्या सूचना आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांना केली होती. त्यानुसार विरोधी पक्षनेते भोईर यांनी तिघांची नावे आज आयुक्तांना सादर केली. त्यात महापालिका निवडणुकीत नवी सांगवी-पिंपळे गुरव प्रभाग क्रमांक 31 मधून पराभूत झालेले पक्षाचे माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, इंद्रायणीनगर-गवळीमाथा प्रभाग क्रमांक 8 मधून पराभूत झालेल्या आणि भाजपातून राष्ट्रवादीत आलेल्या सीमा साळवे आणि पक्षाचे शहर कार्याध्यक्ष फजल शेख यांचा समावेश आहे. त्या तिघांचे अर्ज आयुक्तांनी वैध ठरवले आहेत.

## स्वराज काळभोर याची राष्ट्रीय बीच रेसलिंग स्पर्धेसाठी निवड

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचा पैलवान स्वराज काळभोर याची चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय युनिव्हर्सिटी बीच रेसलिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ५ ते ११ मार्च दरम्यान चेन्नई येथे या स्पर्धा पार पडणार आहेत.

स्वराज हा राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक विजेता ठरला आहे. यापूर्वी चंदीगड येथे झालेल्या राष्ट्रीय युनिव्हर्सिटी स्पर्धेत त्याने आपल्या महाविद्यालयाचे नेतृत्व करत उल्लेखनीय कामगिरी केली होती. आता बीच रेसलिंग प्रकारात राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने क्रीडा वर्तुळात त्याचे कौतुक होत आहे.

स्वराजच्या घरातच कुस्तीची समृद्ध परंपरा आहे. त्यांचे आजोबा कै. बाळासाहेब काळभोर तसेच पैलवान रघुनाथ काळभोर हे नावाजलेले मल्ल होते. त्याचे वडील राजेश काळभोर हे राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असून पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध पैलवान म्हणून त्यांची ओळख आहे. कुटुंबातील या परंपरेचा वारसा स्वराज समर्थपणे पुढे नेत आहे. सध्या स्वराज हा रुस्तम हिंद अमोल बुचडे अकॅडमी, मारुंजी येथे अमोल बुचडे व नरेंद्र कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहे. तो सध्या बीटेक (कम्प्युटर सायन्स) चे शिक्षण घेत असून क्रीडा व शिक्षण यांचा उत्तम समतोल साधत आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष हनुमंत गावडे तसेच पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाचे सचिव संतोष माचुत्रे यांनी स्वराजचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या ट्रस्टमधील ज्ञानेश्वर लांडगे व विठ्ठल काळभोर यांनीही त्याचे कौतुक करून राष्ट्रीय स्पर्धेत यश मिळविण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. चेन्नई येथे होणाऱ्या या स्पर्धेत स्वराजकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात असून पिंपरी-चचिंचवड परिसरातील क्रीडाप्रेमी त्याला शुभेच्छा देत आहेत.

## आयुक्तपदी डॉ. अभिजित चौधरी; डॉ. योगेश म्हसे यांची बदली

**पिंपरी (दै. संध्या) :**



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्तपदी डॉ. अभिजित चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागपूर महापालिकेत ते सध्या आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. तर, पीएमआरडीएचे सध्याचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांची मंत्रालयात अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव म्हणून बदली करण्यात आली आहे. बदलीसंदर्भातील आदेश राज्य शासनाकडून बुधवार (दि.४) सायंकाळी काढण्यात आला. पीएमआरडीएच्या आयुक्तपदाचा पदभार डॉ. म्हसे यांनी तत्कालीन आयुक्त राहुल महिवाल यांच्या हस्ते जून २०२४ मध्ये स्वीकारला होता. त्यानंतर त्यांनी पीएमआरडीएच्या अनेक प्रकल्पांना गती दिली. सेक्टर १२ येथील गृहप्रकल्पांतील त्रुटीबाबत स्ट्रक्चरल ऑडिट, मेट्रोच्या संथ कामांना गती देण्यासाठी कंत्राटदार कंपनीला नोटीस, अनधिकृत हॉटेल्स व होर्डिंगवर कारवाई यासोबतच अनधिकृत बांधकामांवर फौजदारी गुन्हे दाखल केले.

दरम्यान, राज्य शासनाच्या आदेशानुसार डॉ. योगेश म्हसे यांची बदली झाली असून, त्यांच्या जागी नागपूर महापालिकेचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. चौधरी यांनी यापूर्वी सांगली, भंडारा येथे जिल्हाधिकारी; तसेच छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर महापालिका आयुक्त म्हणून काम पाहिले आहे. त्यानंतर त्यांना आता पुण्यातील पीएमआरडीए आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, प्रस्तावित रिंग रोड, माण-हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो वेळेत धावणे, गृहप्रकल्प, इंद्रायणी, पवना आणि मूळा नदीसुधार प्रकल्प, २० नगररचना योजना या कामांचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

## भाजपची कोअर कमिटी बरखास्त

**वडगाव मावळ (दै. संध्या) :**

मावळ तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर मावळ भाजपने अखेर आत्मचिंतन करत पक्ष संघटनेत सर्वाधिकार असणारी कोअर कमिटी बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या कोअर कमिटीमध्ये तरुणांना संधी देण्याचा निर्णय घेत एक प्रकारे पक्षाची सूत्रे ज्येष्ठांकडून तरुणांकडे सोपवून भाकरी फिरवण्याचा मोठा निर्णय घेतला असल्याचे दिसते. तब्बल 25 वर्षे सलग मावळ विधानसभा, मावळ पंचायत समितीमध्ये असलेली सत्ता, तसेच लोणावळा नगर परिषदमध्ये असलेली एकहाती सत्ता भाजपने गमावली, याशिवाय तळेगाव नगर परिषदमध्ये भाजपचे नगराध्यक्ष असले तरी ते महायुतीचे नगराध्यक्ष म्हणून विजयी झाले असून, केवळ 10 नगरसेवक राहिले. याशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत भाजपला एकही जागा मिळाली नाही. एकंदर यासर्व पराभवामुळे भाजपच्या हातात एकही सत्ताकेंद्र राहिले नाही. त्यामुळे विशेषतः जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीनंतर मावळ तालुका कमळमुक्त झाल्यासारखी अवस्था झाली असून, पराभवाचे आत्मचिंतन आणि ठोस निर्णय घेण्याची वेळ भाजप नेत्यांवर आली.

## घोषणांची प्रभावी अंमलबजावणी करा

### अण्णाभाऊ साठे महामंडळ आणि जैन अल्पसंख्याक महामंडळाच्या निधीसाठी आमदार अमित गोरखे सरसावले

#### आमदार अमित गोरखे यांची भूमिका

सरकारने विविध महामंडळांच्या आणि भरतीच्या केवळ घोषणा केल्या आहेत. जोपर्यंत निधी मिळत नाही आणि अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत सामान्यांना न्याय मिळणार नाही. ही सर्व कामे तातडीने मार्गी लागावीत हीच आमची भूमिका आहे

**पिंपरी (दै. संध्या) :**



राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी आक्रमक पवित्रा घेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाची प्रलंबित कामे, शिक्षक भरतीमधील दिरंगाई आणि विविध समाजांच्या न्याय्य हक्कांच्या मुद्द्यांवरून सरकारला धारेवर धरले. केवळ घोषणा नको तर ठोस अंमलबजावणी हवी, अशा शब्दांत त्यांनी सरकारकडे मागणी केली.

आमदार अमित गोरखे यांनी मातंग समाजाच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाच्या असलेल्या अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचा मुद्दा प्रकर्षाने मांडला. महामंडळाची पाच वर्षांची खंड हमी संपली असल्याने ती तात्काळ देण्यात यावी आणि महामंडळाच्या कामांसाठी स्वतंत्र १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच 'आर्टी' संस्थेसाठी २०० कोटींची गरज असताना केवळ १० कोटी दिल्याने त्यांनी नाराजी व्यक्त करत, उर्वरित १९० कोटी रुपये तात्काळ मंजूर करण्याची मागणी केली. डीएड पदवीधरांचे भविष्य अंधारात; पवित्र पोर्टलवरून ओढले ताशेरे


राज्यातील हजारो डीएड पदवीधारकांच्या बेरोजगारीकडे लक्ष वेधताना अमित गोरखे म्हणाले की, पवित्र पोर्टलच्या संथ कारभारामुळे शिक्षक भरती रखडली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून तरुणांचे भविष्य टांगणीला लागले आहे. शिक्षक भरती तात्काळ पूर्ण करणे, तसेच कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद न करणे आणि शालेय पोषण आहाराचा दर्जा सुधारण्यासाठी पुरेसा निधी देणे, या मागण्यांसाठी त्यांनी सरकारकडे पाठपुरावा केला. शालेय शिक्षण विभागासाठी त्यांनी लाक्षणिक मागणी मांडून सरकारचे लक्ष वेधले.

राज्य सरकारने 'जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची' घोषणा केली, मात्र अद्याप निधी न मिळाल्याने हे महामंडळ केवळ कागदावरच असल्याचे गोरखे यांनी निदर्शनास आणून दिले. समाजातील तरुण मदतीची वाट पाहत असून, सरकारने केवळ घोषणाबाजी न करता ठोस निधी द्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

#### दिव्यांग बांधवांच्या हक्कासाठी लाक्षणिक मागणी

दिव्यांग बांधवांच्या रखडलेल्या योजनांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी गोरखे यांनी सहा हजार रुपयांची लाक्षणिक पुरवणी मागणी सादर केली. हा प्रश्न रकमेचा नसून दिव्यांगांच्या हक्काचा, सन्मानाचा आणि स्वतंत्र निधी तरतुदीचा आहे, असे ते यावेळी म्हणाले.

# ह.भ.प. मुक्ताजी महाराज नाणेकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



**चाकण (दै. संध्या)**

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तुत्वाने समाजात वेगळा ठसा उमटवणारे अखिल भारतीय वारकरी संप्रदायाचे जिल्हा समन्वयक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, समाज प्रबोधनकार व वारकरी संप्रदायाचे भूषण ह.भ.प. मुक्ताजी महाराज नाणेकर यांच्या ८६ व्या वाढदिवसा निमित्त चाकण पंचक्रोशीतील भाविक व नागरिकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

ह.भ.प. मुक्ताजी महाराज नाणेकर हे चाकण दुग्ध संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब मांजरे यांचे सासरे, तर महावीर पतसंस्थेच्या उपाध्यक्षा रोहिणी मांजरे यांचे वडील आहेत. नाणेकर यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ समाज प्रबोधनकार ह.भ.प. गणेशनाथ महाराज भीमाशंकर व उद्योजक बाळासाहेब मांजरे यांच्या हस्ते नाणेकर दादांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महावीर पतसंस्थेच्या उपाध्यक्षा रोहिणी मांजरे, चाकण पतसंस्थेचे संचालक निलेश टिळेकर, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते मुरलीधर मांजरे, उद्योजक विकास नाणेकर, रेश्मा मांजरे, विकी मांजरे, शुभम मांजरे आदी उपस्थित होते.

आधी केले मग सांगितले हे ब्रीद सत्यात उतरविणारे नाणेकर महाराज यांचे सामाजिक व सांप्रदायिक क्षेत्रातील भरीव कार्य आजच्या पिढीला चालना व प्रेरणा एक चालता बोलता इतिहास आहे. नाणेकर महाराज यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना आजपर्यंत राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ह.भ.प. मुक्ताजी महाराज नाणेकर यांनी सांगितले की," खेड तालुका हा संतांचा आणि क्रांतिकारकांचा आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी अखेरच्या श्वासापर्यंत वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजप्रबोधन चालू ठेवणार आहे. आई, वडील व संत हेच आपले गुरु आहेत." रोहिणी मांजरे व रेश्मा मांजरे यांनी स्वागत केले. शुभम मांजरे व विकी मांजरे यांनी आभार मानले.



## विजेच्या कामातील एक चूक तीन पिढ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करते

- महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांचे प्रतिपादन
- महावितरण मध्ये 'लाईनमन दिवस' उत्साहात साजरा

**बारामती (दै. संध्या)**

विजेची कामे करताना झालेली एक चूक त्या लाईनमनच्या तीन पिढ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करते. त्याच्यासह अवलंबून असलेले वृद्ध आईवडील व मुलांचे भविष्य अंधकारमय बनते. त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांनी विजेची कामे करताना सुरक्षा साधनांचा वापर करत चुका टाळल्या पाहिजेत असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी केले.

बुधवारी (दि. ४ मार्च) ४ थ्या राष्ट्रीय लाईनमन दिनानिमित्त खेड शिवापूर येथील नक्षत्र पॅलेस मध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे, पुणे ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, कार्यकारी अभियंता देविदास बैकर, धनंजय आहेर, संदीप शेंडगे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांची प्रमुख उपस्थिती होती. लाईनमन दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर, तणावमुक्त जीवन व आरोग्य विषयक काळजी कशी घ्यावी याबाबत वीज कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली. पुढे बोलताना संचालक श्री. पवार म्हणाले, 'पुढील काळ स्पर्धेचा आहे. त्यामुळे आपण आपल्या सेवेत सुधारणा करुन शंभर टक्के वीजबिल वसुलीचे ध्येय प्रत्येकाने गाठावे. वीज कर्मचाऱ्यांना लागणारी सर्व अत्याधुनिक सुरक्षा साधने लवकरच मिळणार आहेत. त्याचा कटाक्षाने वापर करावा आणि आपली कामे सुरक्षितपणे पार पाडावीत. कारण जीव पैशाने विकत घेता येत नाही.' पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे म्हणाले की, 'ग्राहकांना वीज सेवा देणारा महावितरणचा प्रतिनिधी हा लाईनमनच असतो. तो ग्राहकांशी कसा वागतो त्यावरुन त्या भागात महावितरणची प्रतिमा बनत असते. त्यामुळे ग्राहकांशी चांगले वागा, त्यांच्या समस्या वेळेत सोडवा. यावेळी अधीक्षक अभियंता युवराज जरग व कार्यकारी अभियंता देविदास बैकर यांनीही कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

उपस्थित लाईनमन यांच्यापैकी सूर्यकांत शिंदे, अमोल शेलार, रुपेश कांबळे, महिला विद्युत सहाय्यक निषाद शेख आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मुळशी विभागातील सर्व लाईनमन व लाईन वूमन यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन सहा. अभियंता रसिका कुलकर्णी, प्रास्ताविक अतिरिक्त कार्यकारी अभियंता स्नेहलता हंचाटे यांनी केले तर आभार शाखा अभियंता विनायक शिंदे यांनी मानले.

### प्रत्येक सोमवारी सुरक्षेची प्रतिज्ञा

वीज कर्मचाऱ्यांना विद्युत सुरक्षेची सवय लागावी. दैनंदिन कामे करताना त्याचे स्मरण व्हावे यासाठी महावितरणने वीज कर्मचाऱ्यांना प्रत्येक आठवड्याची सुरुवात सामुहिक विद्युत सुरक्षेची प्रतिज्ञा घेऊन करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच याची खातरजमा करण्यासाठी प्रत्येक शाखा अभियंत्याने प्रतिज्ञा घेतल्याचे छायाचित्र महावितरणच्या पोर्टलवर अपलोड करायचे आहे. लाईनमन दिनाची सुरुवातही सुरक्षा प्रतिज्ञेनेच झाली. तर मुळशी विभागांतर्गत २६ शाखा कार्यालयांना महावितरणचे संचालक (मासं) श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते आवश्यक सुरक्षा साधनांचे प्रातिनिधीक वाटप करुन समारोप करण्यात आला.

### ५ आयएसओ मानांकन

पुणे ग्रामीण मंडलांतर्गत अनुक्रमे पुणे ग्रामीण मंडल, मुळशी विभाग, हडपसर ग्रामीण उपविभाग, येणेरे ३३/११ केव्ही उपकेंद्र व २२/२२ केव्ही कोलते पाटील स्विचिंग स्टेशनला आयएसओ मानांकन मिळाले त्याचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## पुरंदर तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२६ चे आयोजनासाठी सासवड येथे बैठक संपन्न




**नाझरे सुपे (दै. संध्या)**

महाराष्ट्र शासन व वनविभागाकडील शासन निर्णयानुसार ग्रामीण भागात सर्व सामान्य जनता व शेतकरी विद्यार्थी महिला यांचे महसूल विभागाशी दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी ताबडतोब निकाली काढणे, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये मंडल स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान आयोजित करण्यात आदेश दिले आहेत. पुरंदर तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. सदर महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी तहसीलदार पुरंदर यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार कार्यालय पुरंदर येथे २ मार्च २०२६ रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत पुरंदर तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य सर्व गावचे सरपंच मंडल अधिकारी ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलीस पाटील इत्यादी उपस्थित होते. अभियानाअंतर्गत शिबीरामध्ये देण्यात येणाऱ्या योजना व घटक अ भोगवटादर वर्ग २ , भोगवटादार वर्ग १ , जिवंत सातबारा,सामाजिक अर्थसाहाय्य योजना, तुकडेबंदी कायदा रद्द केल्यानुसार कार्यवाही, शाळेतील मुलांना शैक्षणिक दाखले वाटप करणे पाणंद रस्त्यांची दुरुस्ती करणे, सर्वांसाठी घरे अंतर्गत पट्टे वाटप करणे २) समाधान शिबिर अंतर्गत सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावयाच्या सेवा, प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती करणे,लोक सेवा हक्क कायदा तात्काळ सेवा पुरविणे,अकृषक तरतुदी संदर्भातील सुधारणा बाबत मार्गदर्शन करणे, डिजिटल/७/१२ कायदेशीर वैधताबाबत जनजागृती करणे,कमी जास्त पत्रके तयार करणे,एक खिडकी व्यवस्था शिबिरादरम्यान खालील नमूद व इतर सेवा उपलब्ध करून देणे ई-मोजणी,ॲग्रीस्टॅक,पी. एम.किसान, तक्रार निवारण करणे महसूल प्रशासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवावा असे आवाहन तहसीलदार विक्रम राजपूत यांनी केली आहे.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**नारायणगाव (दै. संध्या)**

जागतिक महिला दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी नारायणगाव व वैद्यकीय आघाडी आणि जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन शनिवार (दिनांक 7/3/2026)रोजी सकाळी 9 ते 3 वाजेपर्यंत ओझर रोड,कुबेर मधुकोश सोसायटी शेजारी, कोल्हेमळा,नारायणगाव,ता. जुन्नर, जि. पुणे येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी ॲड. वर्षाताई डहाळे ( चिटणीस,भाजपा महाराष्ट्र प्रदेश ), प्रदीपदादा कंद (जिल्हाध्यक्ष भाजपा पुणे ), आशाताई बुचके (मा. जि. प. सदस्या,पुणे ), संतोषनाना खैरे (जिल्हा उपाध्यक्ष पुणे जिल्हा), डॉ. पंजाबराव कथे ( वैद्यकीय आघाडी अध्यक्ष भाजपा पुणे जिल्हा ), गणेश कवडे (युवा मोर्चा अध्यक्ष भाजपा पुणे जिल्हा), आशिषभाऊ माळवदकर (नारायणगाव सावरगाव अध्यक्ष भाजपा ), संजय वऱ्हाडी( पंचायत समिती सदस्य जुन्नर ),डॉ. पिंकी कथे (संचालक व रेडिओलॉजिस्ट डॉ. कथे डायग्नोस्टिक सेंटर) यांची उपस्थिती असणार आहे. डोळे तपासणी, हृदयरोग तपासणी, दंत रोग तपासणी, संधिवात तपासणी, कॅन्सर मोफत तपासणी(स्तनांचा कॅन्सर ,तोंडाचा कॅन्सर ,गर्भाशयाचा कॅन्सर)

,पोटाचे विकार (मुतखडा हर्निया अपेंडिक्स ),होमिओपॅथिक व केसांची तपासणी, त्वचा तपासणी,

विशेष ,सोनोग्राफी, एक्स रे व रक्त तपासणी मोफत असणार आहे.

तसेच सत्तर वर्षापुढील जेष्ठ व्यक्तींसाठी वय वंदन योजना कार्ड मोफत मिळणार आहे.सदरील शिबिरामध्ये ज्या रुग्णांची शस्त्रक्रिया सांगण्यात येईल त्या सरकारी योजनेमार्फत करण्यात येईल.

तरी जास्तीत जास्त संख्येने महिला वर्गाने उपस्थित राहावे. अशी विनंती करण्यात आली आहे.

## कांद्याला पाणी देणाऱ्या ५२ वर्षीय महिलेवर बिबट्याचा हल्ला




**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील साकोरी येथील पानसरेमळा परिसरात बुधवार (दि. 4) रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास आशालता भिकाजी पानसरे (वय 52) या घराशेजारीच शेतात असलेल्या कांद्याला पाणी देताना शेजारील मक्यात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झेप टाकून हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र पानसरे यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने तेथून धूम ठोकली. सुदैवाने पानसरे यांच्या गळ्याला स्कार्फ गुंडाळला असल्याने त्या थोडक्यात बचावल्या असून , परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेच्या एक दिवस अगोदरच म्हणजे मंगळवार (दि. 3 ) रोजी पानसरे यांच्याच पाळीव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला करून त्याला ठार केले होते. घराच्या आजूबाजूला उसाची शेती असल्याने तसेच ओढ्याला पाण्याची सोय असल्याने या भागात बिबट्याचा वावर वाढला असून स्थानिक ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने पिंजरा लावण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची त्वरित पाहणी करून बिबट्याचा ज्या ठिकाणी हॉटस्पॉट आहे त्या ठिकाणी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात आला आहे. अशी माहिती बेल्हे वनपाल नीलम ढोबळे यांनी दिली.

# बारामतीत कामगाराचे आमरण उपोषण

*"दादा आज असता तर आम्हाला न्याय मिळाला असता" – भावनिक उद्गार*




**बारामती (दै. संध्या)**

पिंपळी (ता. बारामती) येथील युनायटेड स्पिरीट्स लि. (डायाजिओ ग्रुप) या कंपनीतील पाच कामगारांना कामावरून कमी केल्याच्या निषेधार्थ मशिन ऑपरेटर हेमराज साहेबराव जगताप यांनी कंपनीच्या गेटसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सोमवार २ मार्च २०२६ पासून सुरू असलेल्या या उपोषणाला आज चौथा दिवस झाला असून अद्याप प्रशासन किंवा कंपनी व्यवस्थापनाकडून कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. उपोषणादरम्यान बोलताना जगताप भावनिक होत म्हणाले, "दादा आज आपण असता तर आम्हाला न्याय मिळाला असता. आपल्या नसण्याने आमच्यासारख्या कष्टकरी कामगारांवर अन्याय होत आहे. न्याय मिळवण्यासाठी कुणाकडे जावे, असा प्रश्न आम्हाला पडला आहे. आपली उणीव आम्हाला आज प्रकर्षाने जाणवत आहे."

जगताप यांच्या म्हणण्यानुसार, कंपनीच्या जनरल मॅनेजरांनी काही युनियन प्रतिनिधींना हाताशी धरून २५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता कंपनी गेटवरच कामावरून कमी करण्याचे पत्र दिले. कंपनीने २०२२ ते २०२३-२४ या कालावधीतील रजेची नोंद काढून पाच कामगारांना बिनपगारी रजेच्या कारणावरून सेवेतून कमी केल्याचा आरोप त्यांनी केला. हेमराज जगताप हे गेली ३० ते ३५ वर्षे कंपनीत मशिन ऑपरेटर म्हणून काम करत असल्याचे सांगत त्यांनी यापूर्वी कंपनीशी चांगले संबंध असल्याचे नमूद केले. मात्र नव्याने आलेल्या अधिकाऱ्यांनी काही नेत्यांना हाताशी धरून कामगार कमी करण्याचे धोरण राबविल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पूर्वी बॉटलिंग विभागात रिलीव्हर सिस्टीम पद्धतीने काम सुरू होते. मात्र काही लाईनवरील कामगार कमी करून कमी मनुष्यबळात काम घेण्याची पद्धत सुरू केल्याने उर्वरित कामगारांवर कामाचा ताण वाढल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच कंपनीत येताना आणि बाहेर जाताना कामगारांची मशीनद्वारे तपासणी करून दहशतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

जगताप यांनी पुढे सांगितले की, त्यांच्या सेवेत आता अवघी ५ ते ७ वर्षे बाकी असून त्यानंतर निवृत्ती लाभ मिळणार होते. मात्र अशा प्रकारे सेवेतून कमी केल्यास त्यांना योग्य मोबदला मिळणार नसल्याची भीती त्यांनी व्यक्त केली. कुटुंबातील तेच कर्ते असून मुलांचे शिक्षण आणि लग्नाची जबाबदारी असल्याने या निर्णयामुळे कुटुंबावर मोठे संकट ओढवले असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलिस अधिकारी तसेच कंपनी व्यवस्थापनाला लेखी निवेदन देण्यात आले असून न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. तसेच उपोषणादरम्यान त्यांच्या जीवितास काही बरे-वाईट झाल्यास त्याची जबाबदारी कंपनीचे जनरल मॅनेजर, एचआर विभाग आणि संबंधित युनियन नेत्यांवर राहील, असेही त्यांनी नमूद केले.

# सतर्क राहा आणि आर्थिक गुन्हेगारीला आळा घाला : बारामती पोलीस




**बारामती (दै. संध्या)**

भारतातील सर्वात मोठी खाजगी बिगर-बँकिंग वित्तीय संस्था आणि बजाज फिनसर्व्हचा एक भाग असलेल्या 'बजाज फायनान्स लिमिटेड'ने बारामतीत 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' हा सायबर फसवणूक जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. डिजिटल युजर्सना नवनवीन सायबर धोक्यांची माहिती देणे आणि आपल्या कष्टाची कमाई सुरक्षित ठेवण्याचे मार्ग शिकवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

तुळजाराम चतुरचंद (टीसी) कॉलेज, बारामती येथे आयोजित या कार्यक्रमात अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये पीएसआय वर्षाराणी घाटे (पुणे ग्रामीण सायबर सुरक्षा), मानस शर्मा (शेलस्ट्रॉन्ग येथील डिजिटल फॉरेन्सिक आणि इन्सिडंट रिस्पॉन्स अनालिस्ट), श्री. बाबर सर (निवृत्त एसीपी) आणि टीसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचा समावेश होता.

या सत्रादरम्यान, जाणकार वक्त्यांनी बारामती आणि परिसरातील वाढत्या फसवणुकीच्या प्रकरणांवर प्रकाश टाकला. बनावट ओटीपी, फिशिंग, डिजिटल अरेस्ट, कर्ज आणि पेन्शनच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीबाबत त्यांनी नागरिकांना सतर्क केले.

बारामती शहराचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी नागरिकांना सतर्कता वाढवण्याचे आवाहन करताना सांगितले की, "अवाजवी नफ्याचे आमिष दाखवणाऱ्या कोणत्याही ऑफरपासून सावध राहा, ती फसवणूक असू शकते. आपण सर्वांनी 'जागरूकतेचे दूत' बनणे आणि आपल्या समाजाला वाढत्या आर्थिक गुन्ह्यांपासून वाचवण्यासाठी मदत करणे ही काळाची गरज आहे."


'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' कार्यक्रम लोकांना त्यांची वैयक्तिक आणि महत्त्वाची माहिती सुरक्षित ठेवण्याचे सोपे मार्ग शिकवतो. यामध्ये आपला ओटीपी आणि पिन कोणालाही न देणे आणि कोणत्याही अनोळखी ईमेल, मेसेज, लिंक, क्यूआर कोड किंवा संशयास्पद ॲपवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी या मोहिमेअंतर्गत मोठ्या शहरांमध्ये कार्यशाळा आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

कार्यक्रमादरम्यान, सायबर गुन्हे शाखेच्या अधिकारी पीएसआय वर्षाराणी घाटे यांनी डिजिटल सुरक्षा अधिक मजबूत करण्यावर मार्गदर्शन केले. सायबर गुन्हेगार आता नवनवीन मार्गांनी फसवणूक करत आहेत, त्यामुळे सामान्य नागरिक आणि संस्थांनी स्वतःच्या बचावासाठी नवीन सुरक्षा फीचर्स आणि टूल्सची माहिती घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' कार्यक्रम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४ च्या त्या नियमावलीनुसार आहे, जी एनबीएफसी कंपन्यांसाठी तयार करण्यात आली आहे. हे नियम फसवणूक त्वरित ओळखणे, कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि जनतेचा सहभाग वाढवण्यावर भर देतात, जेणेकरून डिजिटल व्यवहार सर्वांसाठी सुरक्षित होऊ शकतील.

या मोहिमेचा उद्देश लोकांना अशा ठगांपासून वाचवणे आहे, जे नामांकित कंपन्यांच्या नावावर बनावट व्हॉट्सॲप ग्रुप, सोशल मीडिया अकाउंट्स आणि वेबसाइट्स चालवतात. हे ठग कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवून लोकांशी खोटे बोलतात आणि त्यांना आपल्या जाळ्यात फसवतात.

या प्रसंगी बजाज फायनान्स लिमिटेडच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, "आमच्या ग्राहकांची आर्थिक सुरक्षा आमच्यासाठी सर्वोच्च आहे. आम्ही सोशल मीडिया, ऑनलाइन जाहिराती आणि थेट लोकांशी संवाद साधून त्यांना सातत्याने जागरूक करत आहोत आणि खबरदारी घेण्याचा सल्ला देत आहोत, जेणेकरून प्रत्येक जण सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहू शकेल."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नारायणगाव नगरीत उभारल्या 33 फडमालकांनी राहुट्या

नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे ,नगर तसेच विविध जिल्ह्यांमध्ये मार्च ते मे दरम्यान यात्रा ,जत्रांचा हंगाम सुरु होतो .त्यातीलच ग्रामीण भागामध्ये यात्रा ,जत्रा म्हटले की , तमाशा हा करमणुकीसाठी ठेवण्यात येतो.त्या पार्श्वभूमीवर तमाशा पंढरी म्हणून ओळख असलेल्या नारायणगाव नगरीत राज्यातील ३३ फडमालकांनी आपल्या राहुट्या उभारून तमाशा कार्यक्रमाची नोंदणी सुरु केली आहे . या राहुट्यांचा मुक्काम अक्षयतृतीयेपर्यंत राहणार आहे. या राहुट्यांच्या जागेचा प्रश्न यावर्षी स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यांनी सोडविण्यात आला. खाजगी मालकीच्या तीन एकर क्षेत्रात जागा उपलब्ध करून देण्यात आली असून ग्रामपंचायतीकडून पिण्याच्या पाण्याची व विजेची सुविधा देण्यात आली आहे. मागील सुमारे ७० वर्षांपासून दरवर्षी फेब्रुवारी महिना आला की राज्यातील फडमालक हे व्यवसायानिमित्त नारायणगाव नगरीत येत असतात .नारायणगावकर या फडमालकांचे उत्साहाने स्वागत करून त्यांना त्यांच्या राहुट्या उभारण्यासाठी आवश्यक असणारी जागा ,वीज ,पाणी तसेच विविध सेवा उपलब्ध करून देतात .ज्याठिकाणी फडमालकानी आपली राहुटी उभारली आहे त्या प्रत्येक राहुटीच्या वरच्या भागात फड मालकाचे नाव असलेला फलक लावलेला आहे .त्यामुळे गावोगावच्या यात्रा ,जत्रा कमिटीचे प्रमुख ,सरपंच ,उपसरपंच या नारायणगाव नगरीत येऊन जो लोकनाट्याचा कार्यक्रम पाहिजे आहे तो सुपारी देऊन ठरवत आहेत .मागील चार ते पाच दिवसामध्ये ३३ फडमालकांचे ५० करार झाले आहेत .अशी माहिती फड मालक आविष्कार मुळे ,किरण ढवळपुरीकर ,मोहित नारायणगावकर ,इनामदार यांनी दिली .



# मेथी दाणे केवळ मधुमेहासाठीच नाही तर गंभीर आजारांसाठी देखील उत्तम

**मेथीचे दाणे दिसायला लहान असले तरी, त्यांचे आरोग्यासाठी खूप फायदे आहेत. प्राचीन काळापासून आयुर्वेदात त्यांचा औषधी वनस्पती म्हणून वापर केला जात आहे. मेथीच्या दाण्यामध्ये जीवनसत्त्वे अ, ब, क आणि के तसेच फायबर, लोह, मँगनीज, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम सारखी खनिजे भरपूर प्रमाणात असतात. मेथीचे दाणे भिजवून त्यांचे सेवन करणे विशेषतः फायदेशीर ठरू शकते असं तज्ञांचं म्हणणं आहे. तर, तुमच्या आहारात मेथीचे दाणे समाविष्ट करण्याचे आरोग्य फायदे जाणून घेऊया...**

साखर नियंत्रण: तज्ञांचं म्हणणं आहे की, मेथी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते. त्यात भरपूर फायबर आढळतात. जे पचन सुधारण्यास मदत करतात. शिवाय, ते अन्नातून कार्बोहायड्रेट्स आणि ग्लुकोजचे जलद शोषण रोखते. मेथीमध्ये हायड्रॉक्सिल्यूसिन 4 नावाचे अमीनो अल्केनोइक ॲसिड देखील असते. जे इन्सुलिनचे उत्पादन वाढवते आणि पेशींना इन्सुलिन शोषण्यास मदत करते. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासानुसार, प्रीडायबिटीज असलेले लोक जे दररोज 10 ग्रॅम मेथी खातात त्यांना मधुमेह होण्याचा धोका कमी असतो आणि त्यांना कोणतेही दुष्परिणाम जाणवत नाहीत. ते इन्सुलिन प्रतिरोध कमी करण्यास देखील मदत करते.

मेथीमधील फायबर फायदेशीर आतड्यांतील बॅक्टेरियाच्या वाढीस चालना देण्यास मदत करते असं तज्ञांचं म्हणणं आहे. ते म्हणतात की, यामुळे बद्धकोष्ठता, गॅस, आम्लता आणि पोटफुगी यासारख्या समस्या कमी होण्यास मदत होते. सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेली मेथी खाल्ल्याने पचन सुधारते असं मानलं जातं. वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारात मेथीचा समावेश करण्याची शिफारस तज्ञ करतात. त्यांचं म्हणणं आहे की, मेथीमधील फायबरमुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे जास्त कॅलरीजचे सेवन टाळण्यास मदत होते. म्हणून, आहारात मेथी पावडर किंवा मेथी दाण्याचा समावेश केल्याने भूक कमी होण्यास आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते.

स्नायूंच्या बळकटीसाठी: मेथीमध्ये आढळणारे प्रथिने, फायबर आणि मॅग्नेशियम स्नायूंच्या बळकटीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात असं तज्ञांचं म्हणणं आहे. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासात असं म्हटलं आहे की, मेथी व्यायामानंतर थकलेल्या आणि जखमी झालेल्या स्नायूंना आराम देण्यास मदत करते आणि दुखापतींमधून लवकर बरे होण्यास मदत करते.

कोलेस्टेरॉल नियंत्रण: नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, मेथी शरीरातील वाईट कोलेस्टेरॉल कमी करू शकते आणि हृदयरोगाचा धोका कमी करू शकते. मेथीमधील फ्लेव्होनॉइड्स शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करतात असे तज्ञांचं म्हणणं आहे.

स्तनपान देणाऱ्या मातांसाठी: तज्ञांचं म्हणणं आहे की, मेथी स्तनपान देणाऱ्या मातांसाठी खूप फायदेशीर आहे. त्यांचं म्हणणं आहे की मेथीचा चहा पिल्याने बाळांमध्ये दुधाचा पुरवठा वाढतो. शिवाय, अनेक अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, मेथीमुळे बाळांचे वजन वाढण्यास आणि निरोगी राहण्यास मदत होते. परंतु, NIH च्या एका अभ्यासात असं म्हटलं आहे की, गर्भधारणेदरम्यान शिफारस केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त मेथीचे सेवन करणे असुरक्षित आहे. मेथी आरोग्यासाठी फायदेशीर असली तरी, तज्ञांचा सल्ला आहे की मधुमेहासारख्या आरोग्य समस्या असलेल्या लोकांनी किंवा गरोदर महिलांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच योग्य प्रमाणात ते सेवन करावं.



# सिद्दीपेटमध्ये बालहृदयांना नव‘संजिवनी’! जन्मजात हृदयरोगी बालकांसाठी मोफत उपचार, असा साधा संपर्क


**जिल्ह्यातील कोंडापाका इथं सुरू झालेल्या श्री सत्य साई संजीवनी सेंटर ऑफ चाईल्ड हार्ट केअर ॲण्ड रिसर्च या अत्याधुनिक रुग्णालयामुळे जन्मजात हृदयरोगांनी ग्रस्त असलेल्या चिमुकल्या जीवांना नवसंजीवनी मिळत आहे. जागतिक दर्जाचे उपचार पूर्णपणे मोफत देणारं हे केंद्र शेकडो कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरलं आहे. या रुग्णालयात आतापर्यंत भारतासह 14 देशांतील 233 बालकांवर यशस्वी ओपन-हार्ट शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत, तर 103 बालकांवर ॲडव्हान्स्ड कार्डियाक इंटरव्हेन्शन्स करण्यात आले आहेत. एकूण 336 बालकांचे प्राण वाचवण्यात यश आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. सी. श्रीनिवास यांनी दिली.**


सर्व उपचार पूर्णपणे मोफत : भारतामध्ये दरवर्षी सुमारे 3.5 लाख बालकं हृदयविकारांसह जन्माला येतात. त्यापैकी जवळपास एक लाख बालकांचा वेळेवर आणि परवडणारा उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू होतो. अशा कुटुंबांसाठी हे संजीवनी केंद्र वरदान ठरत आहे. या उपक्रमांतर्गत कोंडापाका (तेलंगणा) व्यतिरिक्त नया रायपूर, पलवल आणि नवी मुंबई या ठिकाणीदेखील रुग्णालयं स्थापन करण्यात आली आहेत. ही सर्व केंद्रे सत्य साई आरोग्य आणि शैक्षणिक ट्रस्ट द्वारे चालवली जातात. रुग्णालयात तपासणीपासून शस्त्रक्रिया, औषधं, अन्न व निवास व्यवस्था सर्व काही मोफत उपलब्ध आहे. उपचारादरम्यान बालकांसोबत पालकांनाही राहण्याची व जेवणाची मोफत सोय केली जाते. स्वयंसेवक दुर्गम व आदिवासी भागांत वैद्यकीय शिबिरं घेऊन गंभीर हृदयरोगांनी ग्रस्त बालकांची ओळख पटवतात व त्यांना उपचारासाठी रुग्णालयात आणतात.

आधुनिक सुविधा आणि तज्ञांची मदत : कोंडापाका येथील संजीवनी हार्ट रुग्णालयाचं उद्घाटन 23 नोव्हेंबर 2024 रोजी झालं. 100 खाटांचं हे रुग्णालय अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि पूर्णपणे डिजिटल प्रयोगशाळेसह सुसज्ज आहे. इथं 24 तास वैद्यकीय सेवा उपलब्ध आहे. रुग्णालयात अत्याधुनिक कॅथ लॅब सुविधा उपलब्ध आहे. पारंपरिक मोठ्या छेदनाऐवजी या पद्धतीत हात किंवा पायातील रक्तवाहिनीतून कॅथेटर नावाची पातळ नळी हृदयापर्यंत पोहोचवून उपचार केले जातात. त्यामुळे वेदना कमी होतात आणि रुग्ण लवकर बरा होतो.

केवळ जन्मजात हृदयरोगांवर उपचार : या केंद्रात फक्त जन्मजात हृदयरोगांवर उपचार केले जातात. आईच्या गर्भात विकसित होणाऱ्या सुमारे 100 प्रकारच्या हृदयविकारांवर इथं शस्त्रक्रिया व उपचार केले जातात. हृदयातील छिद्रं, झडपांचे दोष, असामान्य रक्तप्रवाह, हृदयाची कमजोरी तसंच इतर जीवघेण्या विकारांवर या ठिकाणी विशेष उपचार उपलब्ध आहेत. नवजात बालकांपासून लहान मुलांपर्यंत अतिगंभीर रुग्णांनाही तज्ञ उपचार दिले जातात.

संपर्क कसा साधावा? : उपचारासाठी इच्छुक पालकांनी 8010119000 या क्रमांकावर संपर्क साधून अपॉइंटमेंट घ्यावी किंवा 7075137733 या क्रमांकावर व्हॉट्सॲपद्वारे मेसेज पाठवावा. जागतिक दर्जाचे हृदयउपचार पूर्णपणे मोफत देत श्री सत्य साई संजीवनी बाल हृदयरोग आणि संशोधन केंद्र हे केवळ आजारांवर उपचार करत नाही, तर हजारो मुलांना निरोगी भविष्य देत आहे.





# पुरुषांच्या ३ सवयींमुळे महिलांना होतो सर्व्हायकल कॅन्सरचा धोका

कॅन्सर हा एक गंभीर आजार आहे. जो जगभरात वेगाने पसरत आहे. कॅन्सर दरवर्षी लाखो लोकांचा बळी घेतो. पुरुषांमध्ये फुफ्फुस आणि तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. तर महिलांमध्ये स्तन आणि गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. अलिकडेच, गर्भाशयाच्या ग्रीवेचा कॅन्सर एक गंभीर आरोग्य आव्हान म्हणून उदयास आला. गर्भाशयाच्या ग्रीवेचा कॅन्सर आता वृद्ध महिलांचा आजार राहिलेला नाही. तो तरुण महिलांनाही प्रभावित करत आहे. WHO च्या मते, भारतातील स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात सामान्य कॅन्सर बनला आहे. चिंताजनक बाब म्हणजे, गर्भाशयाच्या ग्रीवेचे संक्रमण कोणत्याही वेदना किंवा लक्षणांशिवाय शांतपणे होऊ शकते. तज्ञांचं म्हणणं आहे की, नवऱ्याच्या तीन सवयी पत्नींमध्ये गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कॅन्सरचा धोका वाढवू शकतात.

मासिक पाळी दरम्यान संभोग - अनेक जोडपी मासिक पाळी दरम्यान संभोग करतात. जरी मासिक पाळी दरम्यान संभोग वैद्यकीयदृष्ट्या सुरक्षित आहे आणि पेटके कमी करण्यास मदत करू शकतो. परंतु त्यामुळे संसर्ग आणि अवांछित गर्भधारणा होण्याचा धोका असतो. मासिक पाळी दरम्यान संभोग केल्याने थेट गर्भाशय ग्रीवाचा कॅन्सर होत नाही. परंतु राष्ट्रीय कर्करोग संस्थेने असं म्हटलं आहे की, यामुळे एचपीव्ही (मानवी पॅपिलोमाव्हायरस) संक्रमणाचा धोका वाढू शकतो. जो एक प्रमुख जोखीम घटक आहे. या काळात गर्भाशय ग्रीवा अधिक नाजूक असते. ज्यामुळे संभोगानंतर रक्तस्त्राव होऊ शकतो (पोस्टकोइटल रक्तस्त्राव), हे कॅन्सरचे लक्षण देखील असू शकते.

धूम्रपान - बरेच पुरुष त्यांच्या कुटुंबासमोर आणि पत्नींसमोर धूम्रपान करतात. परंतु तज्ञांचं म्हणणं आहे की, त्यांच्या पत्नी किंवा कुटुंबासमोर धूम्रपान करणे खूप हानिकारक आहे. कारण दुसऱ्याच्या हाताने घेतलेला धूर श्वास घेतल्याने महिलांमध्ये फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग, स्ट्रोक आणि विशेषतः गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरचा धोका वाढतो. सिगारेटच्या धुरात 7,000 हून अधिक संयुगे असतात. ज्यात 70 हून अधिक ज्ञात कार्सिनोजेन असतात. यामुळे धुराच्या संपर्कात येणाऱ्या महिलांमध्ये श्वसनाच्या समस्या आणि गर्भधारणेच्या गुंतागुंत होऊ शकते.

याव्यतिरिक्त, धूम्रपान करणाऱ्या महिलांना धूम्रपान न करणाऱ्या महिलांपेक्षा गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होण्याची शक्यता दुप्पट असते. संशोधकांना धूम्रपान करणाऱ्या महिलांच्या गर्भाशयाच्या श्लेष्मामध्ये तंबाखूचे घटक आढळले आहेत. हे हानिकारक पदार्थ गर्भाशयाच्या पेशींच्या डीएनएला नुकसान पोहोचवू शकतात आणि गर्भाशयाच्या कर्करोगाच्या विकासास हातभार लावू शकतात. धूम्रपानामुळे रोगप्रतिकारक शक्ती देखील कमकुवत होते, ज्यामुळे एचपीव्ही संसर्गाशी लढण्याची क्षमता कमी होते.

कंडोम न वापरणे - काही लोक आत्म-समाधान किंवा इतर समस्यांमुळे संभोग करताना कंडोम वापरणं टाळतात, परंतु ही पद्धत धोकादायक असू शकते. जर तुमचे अनेक भागीदार असतील किंवा ड्रग्जचे व्यसन असेल तर कंडोमशिवाय लैंगिक संबंध ठेवणं धोकादायक ठरू शकते. उदाहरणार्थ, जर एखाद्या पुरुषाला एचपीव्ही विषाणू असेल तर तो सहजपणे त्याच्या जोडीदाराला संक्रमित करू शकतो. लक्षात ठेवा की, कंडोम ही केवळ गर्भनिरोधक पद्धत नाही, लैंगिक संक्रमित संसर्ग रोखण्यासाठी ते महत्वाचे आहेत.

## गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कॅन्सरची चेतावणी देणारी चिन्हे

- योनीमार्गातील संभोगानंतर रक्तस्त्राव होणे
- रजोनिवृत्तीनंतर रक्तस्त्राव
- डचिंग केल्यानंतर रक्तस्त्राव होणे
- असामान्य योनीतून स्त्राव: यामध्ये रक्ताचे अंश असू शकतात आणि ते मासिक पाळी दरम्यान किंवा रजोनिवृत्तीनंतर देखील होऊ शकतात.
- दुर्गंधीयुक्त पिवळा स्त्राव किंवा रक्ताने भरलेला स्त्राव
- खालच्या ओटीपोटात दुखणे, वारंवार लघवी लागणे किंवा लघवी करण्यास त्रास होणे.
- लैंगिक संभोग दरम्यान वेदना.
- ओटीपोटात वेदना.
- कर्करोग जसजसा वाढत जातो तसतशी लक्षणे अधिक तीव्र होऊ शकतात आणि त्यात समाविष्ट आहेत...
- पायांना सूज येणे
- जर कर्करोग मूत्राशय किंवा मलाशयात पसरला असेल तर लघवी किंवा शौचास त्रास होणे, कधीकधी मूत्र किंवा मलमध्ये रक्त येणे.
- थकवा आणि अस्पष्ट वजन कमी होणे.

जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या एखाद्या व्यक्तीला यापैकी कोणतीही लक्षणे जाणवत असतील किंवा उच्च-जोखीम असलेल्या सवयींमध्ये गुंतलेले असाल, तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरशी लढण्यासाठी प्रतिबंध आणि लवकर निदान अत्यंत महत्वाचं आहे.



# सोप्या टिप्स वापरून घरीच तयार करा नारळाचं तेल

घरी नारळाचे तेल बनवणे किचकट प्रक्रिया वाटू शकते. परंतु प्रत्यक्षात ही एक साधी आणि सोपी प्रक्रिया आहे. फक्त काही नारळ आणि साध्या स्वयंपाकघरातील साधनांसह, तुम्ही कोणतेही पदार्थ, संरक्षक किंवा रासायनिक प्रक्रिया न करता ताजे, शुद्ध नारळाचे तेल तयार करू शकता. ही पारंपारिक पद्धत, ज्याला कोल्ड-प्रेसिंग किंवा वेट-मिलिंग म्हणतात. नारळाचा नैसर्गिक सुगंध, पोषक तत्वे आणि सौम्य चव टिकवून ठेवण्यास मदत करते. घरगुती नारळाचे तेल स्वयंपाक, त्वचेची निगा, केसांची काळजी आणि इतर अनेक दैनंदिन कामांसाठी वापरले जाऊ शकते. चला तर जाणून घेऊया घरी नारळाचं तेल कसं तयार करावं.

**साहित्य**

2-3 पूर्ण पिकलेले नारळ<br>
गरम पाणी (उकळत नाही)<br>
ब्लेंडर किंवा हँड खवणी<br>
बारीक चाळणी किंवा चीजक्लोथ<br>
एक मोठा वाडगा<br>
पॅन<br>
चमचा किंवा स्पॅटुला<br>
झाकण असलेली स्वच्छ काचेची भांडी

**नारळ तेल कसं तयार करावं**

प्रथम, नारळाचं कवच काढा, नंतर नारळ फोडा आणि पाणी एका वेगळ्या भांड्यात काढून टाका (तुम्हाला हवं असल्यास तुम्ही हे पाणी पिऊ शकता). चाकू किंवा नारळ स्क्रॅपर वापरून, कवचातून नारळाचे पांढरे भाग काळजीपूर्वक काढा. नारळाचा लगदा स्वच्छ पाण्याने पूर्णपणे धुवा जेणेकरून कवचाचे उर्वरित तुकडे किंवा घाण निघून जाईल. साफसफाई केल्याने त्याची चव सुधारते आणि तेलाचे आयुष्य वाढते.

आता नारळाला ब्लेंड करा. मिश्रण करणे सोपे करण्यासाठी, नारळाच्या लगद्याचे लहान तुकडे करा. ते तुकडे ब्लेंडरमध्ये घाला आणि थोडं कोमट पाणी घाला. सुरळीत चालण्यासाठी आवश्यक तेवढेच नारळ आणि पाणी वापरा. मिश्रण घट्ट, मलईदार आणि गुळगुळीत होईपर्यंत मिसळा. त्याची पोत जाड नारळाच्या पेस्टसारखी असावी. एका भांड्यावर बारीक चाळणी किंवा चीजक्लोथ ठेवा. त्यात मिसळलेले मिश्रण ओता आणि शक्य तितके नारळाचे दूध काढण्यासाठी ते पूर्णपणे पिळून घ्या. जास्त प्रमाणात, तुम्ही पिळून काढलेला नारळाचा लगदा ब्लेंडरमध्ये परत करू शकता, थोडे अधिक गरम पाणी घाला आणि प्रक्रिया पुन्हा करा. लक्षात ठेवा, हे ताजे नारळाचे दूध तुमच्या तेलाचा आधार आहे.

# व्हिटॅमिन के च्या कमतरतेमुळे उद्भवतात अनेक आरोग्य समस्या

**व्हिटॅमिन के हे एक महत्त्वाचे पोषक तत्व आहे जे रक्त गोठण्यास, हाडांचे आरोग्य आणि हृदयाच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावते. शरीरातील अनावश्यक पेशी काढून टाकण्याच्या आणि नवीन पेशी बनवण्याच्या प्रक्रियेत हे जीवनसत्व खूप महत्वाचं आहे. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती सुधारते. परंतु, व्हिटॅमिन सी किंवा डी च्या तुलनेत याला कमी महत्त्व दिलं जातं. यामुळे लोक आजारांना बळी पडतात. व्हिटॅमिन के च्या कमतरतेमुळे कोणती लक्षणे दिसतात ते जाणून घेऊया!**




व्हिटॅमिन के दोन स्वरूपात येते. K1, जे रक्त गोठण्यास मदत करते. K2, जे कॅल्शियम मऊ ऊतींमध्ये जमा होण्याऐवजी थेट हाडांपर्यंत पोहोचण्यास मदत करते. व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे जखमा होतात, ज्यामुळे रक्तस्त्राव न थांबने, कमकुवत हाडे आणि थकवा यासारख्या आरोग्य समस्या उद्भवतात. तज्ञांचं म्हणणं आहे की, या चेतावणीच्या लक्षणांना लवकर ओळखणे आणि पूरक आहार किंवा जीवनशैलीतील बदल करून दुरुस्त केल्याने दीर्घकालीन समस्या टाळता येतात. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अभ्यासात असं म्हटलं आहे की, व्हिटॅमिन केची कमतरता जास्त रक्तस्त्राव, हाडांची खराब वाढ, ऑस्टियोपोरोसिस आणि हृदयरोगाच्या वाढत्या जोखमीशी संबंधित आहे.

वारंवार जखमा: व्हिटॅमिन के च्या कमतरतेचे सर्वात सामान्य लक्षण म्हणजे किरकोळ दुखापतींनंतरही त्वचेवर जखमा होणे. व्हिटॅमिन केच्या कमतरतेमुळे दुखापत किरकोळ असली तरी, काळे किंवा जांभळे डाग तयार होण्याची शक्यता जास्त असते. जर तुम्हाला तुमच्या शरीरावर अशा असामान्य जखमा वारंवार दिसून येत असतील, तर व्हिटॅमिन के ची चाचणी करणे गरजेचं आहे.

मासिक पाळीत जास्त रक्तस्त्राव: तज्ञांचं म्हणणं आहे की, व्हिटॅमिन के च्या कमतरतेमुळे मासिक पाळीत जास्त रक्तस्त्राव होऊ शकतो. जरी जास्त रक्तस्त्राव होण्याची अनेक कारणे असली तरी, व्हिटॅमिन के च्या कमतरतेकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. पूरक आहारांद्वारे शरीरातील व्हिटॅमिन डीची कमतरता दूर केली जाऊ शकते.

नखाखाली लहान रक्ताच्या गुठळ्या: नखाखाली किंवा पायाच्या नखाखाली काळ्या रेषा आणि लहान रक्ताच्या गुठळ्या हे व्हिटॅमिन के च्या कमतरतेचे सूक्ष्म लक्षण असू शकते. ते कोणत्याही दुखापतीमुळे दिसणाऱ्या पांढऱ्या डागांपेक्षा वेगळे असल्याचं म्हटलं जातं. दुखापत नसली तरीही ते तयार होऊ शकतात. असं म्हटलं जातं की, रक्तवाहिन्या कमकुवत झाल्यामुळे आणि रक्त गोठण्याचे घटक कमी झाल्यामुळे असे लहान रक्तस्त्राव होतात. जरी हे थेट धोकादायक नसले तरी, ते शरीर 'गोठण्याची प्रणाली' योग्यरित्या काम करत नसल्याचे स्पष्ट लक्षण असल्याचं म्हटलं जातं.

हिरड्यांमधून रक्त येणे: तज्ञांचं म्हणणं आहे की, ब्रश करताना किंवा फ्लॉस करताना हिरड्यांमधून रक्त येणे हे व्हिटॅमिन के च्या कमतरतेचे लक्षण आहे. सामान्यतः दैनंदिन तोंडी स्वच्छतेदरम्यान हिरड्यांमधून रक्त येत नाही. असं म्हटलं जातं की, जेव्हा व्हिटॅमिन के चे प्रमाण कमी असते, तेव्हा रक्तवाहिन्या कमी लवचिक होतात आणि त्या सहजपणे रक्तस्त्राव करतात. तोंडी स्वच्छतेच्या सवयींमध्ये बदल न करताही रक्तस्त्राव वाढल्यास या लक्षणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. नियमित दातांची काळजी घेतल्यानंतरही हिरड्यांमधून रक्तस्त्राव होत राहिल्यास, डॉक्टरांचा सल्ला घेणं चांगलं.

विष्ठेमध्ये रक्त: तज्ञांचं म्हणणं आहे की, विष्ठा किंवा लघवीमध्ये रक्त दिसणे हे व्हिटॅमिन केच्या कमतरतेशी संबंधित एक गंभीर लक्षण आहे. विष्ठेमध्ये लाल रेषा तसंच गुलाबी लघवी, हे पचनसंस्थेमध्ये किंवा मूत्रमार्गात रक्तस्त्राव दर्शवितात असं म्हटलं जातं.

ऑस्टियोपोरोसिस: हाडांच्या आरोग्यासाठी व्हिटॅमिन के-2 आवश्यक आहे. तज्ञांचं म्हणणं आहे की, ते शरीराला कॅल्शियम प्रभावीपणे वापरण्यास मदत करणाऱ्या प्रथिनांना उत्तेजित करते. विशेषतः, 'ऑस्टियोकॅल्सिन' नावाचे प्रथिने कॅल्शियम हाडांना बांधतात आणि त्यांना मजबूत करतात असं म्हटलं जातं. healthdirect.gov.au च्या अभ्यासानुसार , पुरेशा के-2 शिवाय, कॅल्शियम हाडांमध्ये योग्यरित्या प्रवेश करू शकत नाही, ज्यामुळे ऑस्टियोपोरोसिस आणि हाडांच्या फ्रॅक्चरचा धोका वाढतो. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी-3 सोबत व्हिटॅमिन के-2 हाडांची ताकद राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

मऊ ऊतींमध्ये कॅल्शियम जमा होणे: तज्ञांचं म्हणणं आहे की, जेव्हा व्हिटॅमिन के-2 चे प्रमाण कमी असते तेव्हा कॅल्शियम हाडांमध्ये जाण्याऐवजी मऊ ऊतींमध्ये जमा होते. हे धमन्या, हृदयाच्या झडपा किंवा मूत्रपिंडांमध्ये होऊ शकते. यामुळे कालांतराने हृदय आणि मूत्रपिंडाच्या समस्या उद्भवू शकतात.

थकवा, अशक्तपणा: तज्ञांचं म्हणणं आहे की, थकवा किंवा अशक्तपणा कधीकधी व्हिटॅमिन के च्या कमतरतेचे लक्षण असू शकते. हे शरीरात सतत सूक्ष्म रक्तस्त्राव किंवा कॅल्शियमच्या कमी वापरामुळे होऊ शकते. यामुळे थकवा जाणवतो. थकव्याची अनेक कारणे असली तरी, व्हिटॅमिन के सारख्या पौष्टिक कमतरता उपचारांनी दूर करता येते. जर तुम्हाला इतर लक्षणांसह सतत थकवा जाणवत असेल, तर चाचणी करून घेणे गरजेचं आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकच्या एका अभ्यासात असं आढळून आलं आहे की, पालेभाज्या, ब्रोकोली आणि ब्रुसेल्स स्प्राउट्स हे व्हिटॅमिन के चे उत्कृष्ट नैसर्गिक स्रोत आहेत.

परंतु, तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखालीच पूरक आहार घेण्याची शिफारस करतात. आहारातील बदल करून आणि संबंधित आरोग्य समस्या ओळखून आणि तज्ञांचा सल्ला घेऊन हे प्रभावीपणे व्यवस्थापित केले जाऊ शकते.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### वाहतूक समस्याबाबत आढावा बैठक

भिवंडी (दैनिक संध्या) : भिवंडीतील रस्ते, अवजड वाहनांचे वाहतूक आणि त्यामुळे वाहतुकीमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेल्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी महापालिका महापौर नारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली व भिवंडीचे आमदार महेश चौघुले, महापालिका आयुक्त अनमोल सागर (भा.प्र. से.) यांच्या उपस्थितीमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये शहरातील अवजड वाहतुकीच्या वेळांचे नियमन, बेकायदेशीर पार्किंग, बेकायदेशीर रिक्षा स्टँड, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होऊन, या मुद्द्यांवर महानगरपालिका प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांनी समन्वयाने कार्यवाही करण्याचे आवाहन,महापौर नारायण चौधरी व आमदार यांनी केले. याप्रसंगी महापालिका उपमहापौर तारिक अब्दुल बारी मोमीन, उपायुक्त विक्रम दराडे, शहर अभियंता, सहाय्यक संचालक नगररचना, सर्व प्रभाग अधिकारी, सर्व पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक उपस्थित होते. बैठकीतील मुद्द्यांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत पुढील 15 दिवसात पुन्हा एकवार बैठक घेऊन आढावा घेण्यात येणार असल्याच्या सूचनाही देण्यात आल्या.



### सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाकचौरे जनसेवा पुरस्काराने सन्मानित

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अत्यंत निष्ठेने कार्य करणाऱ्या जेजुरी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाकचौरे यांना "जनसेवा पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले त्यांनी आपल्या कार्यकाळात शहरातील अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणले आणि शहरवासीयांच्या सुरक्षिततेसाठी सतत कष्ट घेतले आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळे शहरामध्ये चोरी, दरोडा, हत्या यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची घट झाली असून, जेजुरीचे वातावरण अधिक सुरक्षित झाले आहे. हा पुरस्कार कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आला . या कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. संजय सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले . यावेळी सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सोनवणे आणि रघुनाथ ओव्हाळ सर यांच्या हस्ते वाकचौरे यांना सन्मानचिन्ह देण्यात आले. वाकचौरे यांनी पुरस्कार स्वीकारताना, "हे सर्व श्रेय माझ्या पोलिस दलाच्या सहकाऱ्यांना आणि शहरवासीयांच्या सहकार्याला जाते. आम्ही सर्व एकत्रितपणे काम केल्यामुळेच जेजुरी आज एक सुरक्षित शहर बनले आहे," असे सांगितले. या पुरस्काराने वाकचौरे यांच्या कार्याची दखल घेतली असून, त्यांचे योगदान समाजासाठी अतिशय महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्या कार्यामुळे जेजुरी शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेची स्थिती मजबूत झाली आहे. कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते, तसेच पोलिस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी यावेळी उपस्थित राहून वाकचौरे यांच्या कार्याचे कौतुक केले.

### नायगाव येथे रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; 32 जणांचे रक्तदान

पुरंदर(दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागात नायगाव येथे वरद चॅरिटेबल अँड मेडिकल ट्रस्ट संचलित बालाजी ब्लड सेंटर, लोणंद यांच्या वतीने तसेच श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट व सामाजिक कार्यकर्ते ईश्वर चौंडकर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रक्तदान शिबिरात एकूण ३२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विशेष म्हणजे महिलांनीही पुढाकार घेत रक्तदानात सहभाग नोंदवला. रक्तदान करणाऱ्यांमध्ये दीपक ठवाळ, संतोष कड, सुनील चौंडकर, दिनेश शेंडगे, समीर तावरे, योगेश पवार, चेतन बेडसे, धनंजय चौंडकर, तेजस गायकवाड, संदीप चौंडकर, दादा चौंडकर, विजय मेमाणे, संतोष गायकवाड,महेश चौधरी, प्रतिमा खेसे, सुरेखा कड, विनोद भोसले, देवेंद्र खळदकर, सुरज चौंडकर, अमोल चौंडकर, महेश बनकर, संग्राम खेसे, अजय थोरात, बाळासो कड, अक्षय फडतरे, विकास यादव, प्रतीक चव्हाण, चंद्रकांत चौंडकर, तुषार चव्हाण, गणेश खेसे, रियाज सय्यद व जाधव यांचा समावेश होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांनी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांचे आभार मानले. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# वीज प्रश्नावर माऊली यादव यांचा आक्रमक पाठपुरावा

## १५ ठिकाणी ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढणार!

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील पूर्व भागातील माळशिरस, राजूरी, पिंपरी यांसह अनेक गावांमध्ये वाढत्या वीज लोडमुळे शेतीचा वीजपुरवठा विस्कळीत झाला होता. या गंभीर समस्येची दखल घेत पुरंदर पंचायत समितीचे सदस्य माऊली यादव यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे (MSEB) कार्यकारी अभियंता गवई साहेब यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी या भागात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

गेल्या काही काळापासून माळशिरस, राजूरी, पिंपरी, मावडी सुपे, नायगाव, रिसे, पिसे, पोंढे, पांडेश्वर, नाझरे सुपे, नाझरे क.प., रानमळा, कोथळे आणि धालेवाडी या गावांमध्ये विजेचा वापर वाढला आहे. जुन्या ट्रान्सफॉर्मरवर लोड येत असल्याने वारंवार डीपी जळणे, कमी दाबाने वीज मिळणे अशा तक्रारी शेतकऱ्यांकडून येत होत्या. याचा थेट परिणाम रब्बी आणि उन्हाळी पिकांच्या सिंचनावर होत होता.

या नवीन बदलांमुळे शेतीसाठी मिळणारा वीजपुरवठा अधिक उच्च दाबाने (High Voltage) आणि सुरळीत मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या मोटारी जळण्याचे प्रमाण कमी होईल आणि सिंचन व्यवस्था अधिक सक्षम होईल. भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि शेतीचा विस्तार लक्षात घेऊन हे नियोजित काम मैलाचा दगड ठरणार आहे.

कार्यकारी अभियंता गवई यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागाला तांत्रिक पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. लवकरच या कामांना सुरुवात होईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या निर्णयामुळे पुरंदरमधील शेकडो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.



**निवेदनातील प्रमुख मागण्या**

- माऊली यादव यांनी दिलेल्या निवेदनात प्रामुख्याने खालील कामांचा आग्रह धरला आहे:
- १५ ठिकाणी १०० KVA क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर वाढविणे: सध्याच्या ट्रान्सफॉर्मरची क्षमता कमी पडत असल्याने तेथे नवीन उच्च क्षमतेचे संच बसवणे.
- ०७ ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर: ज्या भागात वीज वाहिन्यांवर प्रचंड ताण आहे, अशा ७ नवीन ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसवून लोड विभागणे.
- पायाभूत सुविधांची दुरुस्ती: धोकादायक ठरणाऱ्या वीज वाहिन्यांचा झोळ (Line Sag) काढणे आणि नवीन फ्युज बॉक्स बसवून सुरक्षितता वाढवणे.

"शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याला वेळेवर आणि पुरेसा वीजपुरवठा मिळणे हा त्याचा हक्क आहे. अनेक गावांतून विजेच्या तक्रारी येत होत्या, त्या अनुषंगाने आम्ही कार्यकारी अभियंता गवई साहेबांशी सकारात्मक चर्चा केली आहे. त्यांनी तातडीने ही कामे मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे."
**— माऊली यादव (सदस्य, पंचायत समिती पुरंदर)**

## महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणी चोरीसंदर्भात गुन्हे दाखल

**भिवंडी (दै. संध्या)**

पाणी चोरी संदर्भात अनेक ठिकाणी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार कार्यकारी अभियंता यांना कारवाई करणे बाबत दिलेल्या निर्देशानुसार पाणीपुरवठा विभागाचे संदीप पटनावर यांनी व त्यांच्या टीमने अकरावीच्या ठिकाणी पाहणी करून, शहरातील तीन पोलीस स्टेशन मध्ये पाणी चोरी संदर्भात गुन्हे दाखल केले आहेत.



यासंदर्भात पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार,मोजे-निजामपुरा, अजवा स्वीट समोर, अवचितपाडा, नाशिक रोड, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी शेख मेराज खलील अहमद यांनी महानगरपालिकेची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेच्या जालवाहिनीला छिद्र पाडून अर्धा इंच व्यासाची १ नळ अनाधिकृत जोडणी सर्विस सेंटर करिता घेतलेली असल्यामुळे महानगरपालिकेच्या पाण्याची चोरी अर्धा इंच प्रती कनेक्शन रु.१२,०००/-प्रमाणे (रु.१२,०००/- =०१ कने. ४ वर्षे) रु.४८,०००/-, खड्डा पावती रु.१,४००/- प्रमाणे (रु.१४००/- =१ कने.)= रु.१,४००/, पाण्याची चोरी रु.५०,०००/- असे एकूण रु.९९,४००/- (अक्षरी रु. नव्याण्णव हजार चारशे रु. मात्र) नुकसान करणारे श्री. शेख मेराज खलील अहमद यांच्या विरुध्द शांती नगर पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३२४ (४) मनपाच्या आर्थिक नुकसान करीता कलम ३२६ (क) पाण्याचा प्रवाह वळती केल्याबाबत व कलम ३०३ (२) अन्वये,

तसेच मोजे-नारपोली, चौथाणी कंपाऊंड, नारपोली, भिवंडी येथे पाहणी मुन्नवर नसीम खान यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेच्या पाईपलाईनला छिद्र पाडून एक इंच व्यासाचो २ नळ अनधिकृत जोडणी घेवून चौथा आणि कंपाऊंड येथील एका गाळयामध्ये ५००० लिटर क्षमतेचा ७ नग पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी संकलित करून मिनीडोरमध्ये पाण्याच्या टाकीमधून पंपाद्वारे घेऊन हॉटेल, डाईंग व सायझिंगला पाणी पुरवीत असल्यानचे दिसून आल्याने सदर ठिकाणहून ५००० लिटर क्षमतेचा ७ नग पाण्याच्या टाक्या, ३ नग मोटर, १ नग सवमशॉवल पंप जप्त करण्यात आला आहे तसेच महानगरपालिकेच्या पाण्याची चोरी एक इंच प्रती औद्योगिक कनेक्शन रु ७८००० प्रमाणे २ कनेक्शन चे ३ वर्षाचे रु.४,६८,०००/- नुकसान झाल्याने त्यांचा विरुद्ध नारपोली पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३२४(४), ३२६(अ),३०३ (२) अन्वये आणि मोजे-नारपोली, चोथानि कंपाऊंड, नारपोली, भिवंडी या ठिकाणी असलेल्या नाल्यामधून टाकण्यात आलेले पाईप आज दि.०५/०३/२०२६ रोजी महानगरपालिकेच्या पाईप लाईन व बोरवेल कर्मचारी यांचे मार्फत खंडित करून विविध तीन ठिकाणी पोलीस स्टेशनला पाणी चोरी संदर्भात गुन्हे दाखल करण्याची करण्याची आयुक्त अनमोल सागर (भा.प्र. से.), अतिरिक्त आयुक्त सो यांचे आदेशान्वये कार्यकारी अभियंता संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उप अभियंता सरफराज अंसारी यांचे अधिपत्याखाली विराज भोईर, (पयक प्रमुख), नफीस मोमीन, (सहाय्यक पथक प्रमुख) रत्नदीप भालेराव, अरफात खान (कनिष्ठ अभियंता) यांचे मार्फत करण्यात आली.

## जगात युद्धाचे ढग, भारतात मात्र शांतता

**पिंपरी (दै. संध्या)**



जागतिक पातळीवर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे सामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणावर जीवित व मालमत्तेची हानी होत असल्याने जागतिक शांततेसाठी राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने संत तुकाराम नगर येथे ८ मार्च रोजी रॅली काढण्यात येणार असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी दिली आहे. प्रसिद्धी पत्रकात कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी म्हटले आहे की, आखाती युद्धामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या संघर्षामुळे संपूर्ण जगात अस्थिरता आणि भीतीचे सावट पसरले असून याचे दूरगामी परिणाम आर्थिक आणि सामाजिक स्तरावर जाणवू लागले आहेत.इराणला सुमारे २४ ते ३५ बिलियन डॉलरपर्यंत म्हणजे २ लक्ष रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे, तर इस्रायलचेही २० हजार कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.अमेरिकेलाही अब्जावधींचा फटका बसला असून हजारो निष्पाप नागरिकांनी प्राण गमावले आहेत.लाखो नागरिकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणामुळे भारतातील नागरिक सुखा समाधानाने नांदत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. आखाती देशांमधून जगभर पेट्रोलियम कच्च्या मालाचा पुरवठा होत असल्याने हा संघर्ष अधिक काळ चालल्यास जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतील.इंधन दरवाढ, महागाई आणि बेरोजगारी याचा सर्वाधिक फटका समाजातील सर्व घटकांना व कष्टकरी वर्गाला बसणार आहे.२१व्या शतकात जग प्रगतीपथावर असताना युद्धामुळे पुढील २५ वर्षांची प्रगती मागे जाईल. त्यामुळे भारतासह सर्व प्रमुख राष्ट्रांनी पुढाकार घेऊन तातडीने शांतता प्रस्थापित करावी असे आवाहन कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी केले.

## बारामतीत वयोवृद्ध महिलेची ४५ लाखांची फसवणूक

### पोलीस अधिकारी असल्याचे सांगत व डिजीटल अरेस्टची भिती दाखवत केली वयोवृद्ध महिलेची फसवणूक

बारामती शहर पोलीस स्टेशनमार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या फसवणुकीपासून स्वतःचे व आपल्या कुटुंबियांचे संरक्षण करण्यासाठी सतर्क राहावे व कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास तात्काळ पोलीसांची मदत घ्यावी.
**- (श्रीशैल चिवडशेट्टी), प्रभारी पोलीस निरीक्षक, बारामती शहर पोलीस स्टेशन, जि. पुणे**

**बारामती (दै. संध्या)**



बारामती शहर पोलीस स्टेशन येथे माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम 66(C) अन्वये सायबर फसवणुकीचा (Digital Arrest Scam) गंभीर प्रकार उघडकीस आला असून नागरिकांनी याबाबत विशेष सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादी शकुंतला उद्धव खर्डे,वय 74 वर्षे, रा. डोर्लेवाडी, ता. बारामती, जि. पुणे यांना दिनांक 14/02/2026 ते 27/02/2026 या कालावधीत मोबाईल क्रमांकावरून एका अनोळखी इसमाने WhatsApp द्वारे व्हिडिओ कॉल केला. सदर इसमाने स्वतःला “संदीप पाटील” नावाचा पोलीस अधिकारी असल्याचे खोटे सांगून पोलीस गणवेशात व्हिडिओ कॉल करून विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांच्याविरुद्ध अटक वॉरंट असल्याचे सांगून त्यांना “डिजिटल अरेस्ट” होईल अशी भीती दाखवण्यात आली.

सदर इसमाने भीती व मानसिक दबाव निर्माण करून फिर्यादी यांना त्यांच्या बँकेतील Fixed Deposit (एफ.डी.) तोडण्यास भाग पाडले व वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे वर्ग करण्यास सांगितले.त्या अनुषंगाने फिर्यादी यांनी आरोपीच्या सांगण्यावरून ₹34,60,000/- व ₹11,00,000/- असे मिळून एकूण ₹45,60,000/- (पंचेचाळीस लाख साठ हजार रुपये) इतकी रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांवर वर्ग केली. नंतर आरोपीशी संपर्क होत नसल्याने त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात येऊन त्यांनी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली.सदर प्रकरणी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू आहे.

कोणताही व्यक्ती स्वतःला पोलीस, CBI, ED, न्यायालय किंवा इतर सरकारी अधिकारी असल्याचे सांगून फोन / व्हिडिओ कॉलवर “डिजिटल अरेस्ट” किंवा अटक होईल अशी भीती दाखवत असल्यास त्यावर विश्वास ठेवू नये.

कोणत्याही परिस्थितीत फोन किंवा व्हिडिओ कॉलवरून पैसे ट्रान्सफर करू नयेत.

अशा प्रकारे भीती दाखवून पैसे मागितल्यास त्वरित 1930 या राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. शक्य तितक्या लवकर जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जाऊन तक्रार नोंदवावी. कोणतीही संशयास्पद लिंक, OTP, बँक तपशील किंवा वैयक्तिक माहिती अज्ञात व्यक्तींना देऊ नये.

# अहिल्यानगरमधील ३ लाखांहून अधिक नागरिकांसाठी ‘कॅन्सर केअर’ उपक्रम

## लवकर निदान आणि उपचारांवर भर

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

- इंडियन कॅन्सर सोसायटी, अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात कर्करोग जागरूकता आणि तपासणी मोहिमेचे आयोजन.

इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस), अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांनी एकत्रितरित्या 'सतर्क' हा समुदाय-केंद्रित प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरी या तालुक्यांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृती करणे आणि संगमनेर तालुक्यात विशेष तपासणी मोहीम राबवणे हा आहे. या सर्वसमावेशक कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आशा कार्यकर्त्यांसह इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, जेणेकरून ते जिल्हाभर कर्करोगाबद्दल जनजागृती करू शकतील. यासोबतच संगमनेर तालुक्यात मुखाच्या, स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी विनामूल्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील. या तीन प्रकारच्या कर्करोगांनी ग्रस्त रुग्णांची संख्या ही सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे.




त्यामुळेच, स्क्रीनिंगच्या माध्यमातून या आजारांचे वेळीच निदान करणे अत्यंत आवश्यक आहे. कर्करोगपूर्व लक्षणे आणि कर्करोगाचे निदान प्राथमिक पातळीवरच झाल्यास मृत्यूचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे आणि रुग्णांच्या उपचारांवरील वाढता खर्चही वाचवणे शक्य आहे. केवळ उपचारच नाही, तर कॅन्सरबद्दल समाजात असलेली भीती आणि चुकीचे समज दूर करणे हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे ध्येय आहे. याशिवाय, शाळा आणि कॉलेजमधील मुला-मुलींसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील. यामुळे नवीन पिढी आरोग्याबाबत अधिक जागरूक होईल आणि भविष्यात एक निरोगी समाज घडवण्यास मदत होईल.

हा कार्यक्रम सरकारी प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी आखला आहे. विशेषतः गरीब आणि गरजू लोकांसाठी हे वरदान ठरणार आहे. संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरीमध्ये विविध माध्यमांतून ३ लाखांहून अधिक लोकांपर्यंत आरोग्य संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत एकूण ४५ तपासणी शिबिरे आयोजित केली जातील, ज्यामध्ये ३,१५० लोकांची प्रत्यक्ष वैद्यकीय तपासणी केली जाईल आणि १ लाख लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाईल. ही तपासणी एचपीव्ही, डीएनए सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत एसएमबीटी रुग्णालयाचे मोठे सहकार्य लाभणार आहे. श्रीमती उषा थोरात (नॅशनल मॅनेजिंग ट्रस्टी, इंडियन कॅन्सर सोसायटी) यांनी या उपक्रमाबद्दल बोलताना म्हटले की, "कॅन्सरविरुद्धच्या लढाईत अल्केम फाऊंडेशनसोबतची ही भागीदारी अत्यंत मोलाची आहे. कॅन्सरची लक्षणे, त्यामागील कारणे आणि प्रतिबंधात्मक उपायांची पुरेशी माहिती असणे, हीच या आजारावर मात करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. लोकांकडे योग्य माहिती असेल, तरच ते स्वतःच्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होतील. आपण सर्वांनी मिळून अशा भविष्यासाठी प्रयत्न करूया जिथे कॅन्सरचे निदान वेळीच होईल, प्रभावी उपचार मिळतील आणि रुग्ण या आजारातून पूर्णपणे सावरून सुदृढ आयुष्य जगू शकतील."

अल्केम फाऊंडेशनच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, "आमचा हा कॅन्सर केअर कार्यक्रम तळागाळातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये इंडियन कॅन्सर सोसायटीसोबत काम करताना अशा दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, जिथे लोकांना तपासणी आणि मार्गदर्शनाच्या सुविधा सहजपणे उपलब्ध होत नाहीत. या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना योग्य वेळी योग्य वैद्यकीय मदत मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. "

डॉ. बापूसाहेब नगरगोजे, जिल्हा आरोग्य अधिकारी, अहिल्यानगर यांनी म्हटले की, "आमच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत मोलाचा ठरेल. समाजात सर्वाधिक आढळणाऱ्या तोंड, स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर ते स्वतःहून तपासणीसाठी पुढे येतील. यामुळे आजाराचे वेळेत निदान होईल आणि कॅन्सरचे वाढते प्रमाण रोखण्यास मोठी मदत होईल."